- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, ६ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २३८ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# मोदी-शाह 'गुंगा गुड्डा' : राऊत

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

जंतरमंतर येथे विद्यार्थी आंदोलनात झालेला लाठीचार्ज, पेलेट गनचा वापर यावरून संसदेमध्ये जोरदार खडाजंगी सुरू आहे. राम मंदिर देणगी चोरीचा मुद्दाही गाजत असून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेमध्ये येऊन यावर निवेदन द्यावे अशी मागणी होत आहे. मात्र पंतप्रधान आणि गृहमंत्री संसदेत अनुपस्थित आहेत. यावरून शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी मोदी-शाह यांच्यावर हल्ला चढवला आहे. जंतरमंतरवर लाठीचार्ज कुणी केला, अश्रुधुराच्या नळकांड्या कुणी फोडल्या, पेलेट गन कुणी चालवल्या यावर गृहमंत्री अमित शहा मौन बाळगून आहेत. म्हणते त्यांना गुंगा गुड्डा म्हणावे लागेल. पंतप्रधान मोदींनाही गुंगा गुड्डा म्हणावे लागेल, अशी घणाघाती टीका संजय राऊत यांनी बुधवारी दिल्लीत माध्यमांशी बोलताना केली. संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये विरोधक आक्रमक झाले आहेत. त्यामुळे संसद ठप्प झाली आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, कामकाज होणार नाही. जंतरमंतरवर लाठीचार्ज कुणी केला, पेलेट गन चालवण्याचे आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्याचे आदेश कुणी दिले हे गृहमंत्री संसदेच्या दोन्ही सभागृहात येऊन सांगत नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज चालणार नाही. राम मंदिर लुटीचाही विषय गंभीर आहे. हा विषय दोन्ही सभागृहात घेतला



जात असून यावर सुद्धा पंतप्रधानांना निवेदन द्यावे लागेल, असेही संजय राऊत म्हणाले.

काँग्रेसने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना 'गुंगी गुडिया' असे म्हणत हिणवल्यावरून महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात सत्ताधारी आणि विरोधकांत जोरदार चकमक उडाली आहे. सुनेत्रा पवार यांच्यावरील टीका सहन न झाल्याने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी थेट काँग्रेस कार्यालयात धडक देत गोंधळ घातला. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. इंदिरा गांधी यांच्यासारख्या टोलेजंग व्यक्तीमत्वाला सुद्धा गुंगी गुडिया म्हटले होते. त्यांनी हे सहन केले आणि आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले की मी गुंगी गुडिया नसून स्वतंत्र निर्णय घेणारी, देशाच्या राजकारणावर प्रभाव टाकणारी स्त्री आहे. पुढे इंदिरा गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान म्हणून काम केले त्याच पद्धतीने सुनेत्रा पवार काम करतील, असे संजय राऊत म्हणाले. तसेच काँग्रेसच्या कार्यालयावर हल्ले करण्यापेक्षा त्यांनी लोकांच्या प्रश्नाला उत्तर द्यावे. त्यांचा पक्ष अमित शहांचा पक्ष आहे. अमित शहा जसे लपून बसले आहेत, ती भूमिका त्यांनी स्वीकारली आहे का? असा सवालही संजय राऊत यांनी केला.

### याला जबाबदार राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री

नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन सुरू आहे. याबाबत बोलताना संजय राऊत म्हणाले की, जंतरमंतरवर आंदोलन करण्यापेक्षा राज्याच्या मुख्यमंर्त्याच्या दारात जाऊन आंदोलन केले पाहिजे. कॅबिनेटने हा प्रस्ताव तयार केला आणि उद्धव ठाकरे यांनी हा प्रस्ताव दिल्लीला पाठवला होता. आता ही जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांची आहे. नरेंद्र मोदी नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनाला आले, तेव्हाच दि. बा. पाटील यांच्या नावाची पाटी झळकली पाहिजे होती. ती झळकली का? याला जबाबदार कोण आहे? राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आहेत. मिस्टर शिंदे आठवड्यातून सोळा वेळा दिल्लीला येतात. मुख्यमंत्री आठवड्यातून चार वेळा येतात. मग केंद्राच्या विषयाकडे त्यांना हा पाठपुरावा करता येत नाही का? असा सवालही संजय राऊत यांनी केला.

थोडक्यात

## भारतीय जहाज बुडाले

**सना :** येमेनच्या किनाऱ्याजवळ लाल समुद्रात हिंदुस्थानी मालवाहू जहाजावर हल्ला करण्यात आला. हल्ल्यानंतर जहाज उलटले आणि बुडाले. या जहाजामध्ये १३ भारतीयांसह १४ खलाशी होते. येमेनी कोस्ट गार्डने सर्वांची सुखरूप सुटका करत त्यांना मोखा बंदरावर आणले. परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याचा निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, यमेनच्या किनाऱ्याजवळ एमएसव्ही फैझ नुरे ओलिया जहाजावर हल्ला करण्यात आला. रियाधमधील भारतीय दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी येमेनी अधिकाऱ्यांशी सक्रियपणे समन्वय साधत आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले. तसेच येमेनी अधिकाऱ्यांच्या सहकार्याबद्दल परराष्ट्र मंत्रालयाने त्यांचे आभार मानले आहेत. याआधी जुलै महिन्यात, काळ्या समुद्रात व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्यात एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला होता.

## जम्मू-काश्मिरात पर्यटकांच्या संख्येत घट

**श्रीनगर :** आधीच दहशतवादी कारवायांनी ग्रासलेल्या जम्मू-कश्मीरला पहलगाम हल्ल्यामुळे आणखीनच फटका बसला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पर्यटकांनी जम्मू-कश्मीरकडे पाठ फिरवली आहे. २०२५ मध्ये जम्मू-कश्मीरमधील परदेशी पर्यटकांसह देशांतर्गत पर्यटकांच्या संख्येत घट झाली आहे. २०२५ मध्ये जम्मू आणि कश्मीरमधील पर्यटकांच्या संख्येत घट झाली आहे. २०२२ च्या तुलनेत, २०२५ मध्ये राज्यात येणाऱ्या देशांतर्गत पर्यटकांच्या संख्येत अंदाजे २३ टक्के घट झाली, तर परदेशी पर्यटकांच्या संख्येत ४४ टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली, अशी माहिती केंद्र सरकारने लोकसभेतील एका प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे.

# दुसऱ्या महायुध्दानंतरचा सर्वात मोठा हल्ला करणार : ट्रम्प

**वृत्तसंस्था, तेहरान**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदीवरून अमेरिका आणि इराण यांच्यातील लष्करी व राजनैतिक तणाव अधिकच ताणला गेला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला शेवटची संधी देत, होर्मुझची सामुद्रधुनी लवकरात लवकर खुली न केल्यास दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सर्वात मोठ्या आणि तीव्र लष्करी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट इशारा दिला आहे.



मुलाखतीत ट्रम्प म्हणाले, आम्ही इराणशी चर्चा करत असून त्यांना ही एक शेवटची संधी देत आहोत. ते लवकरच यावर कोणताही एक निर्णय घेतील. ही काही फार गुंतागुंतीची बाब नाही. आम्ही होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याबाबत चर्चा करत आहोत. मात्र, अमेरिकेसोबत कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे इराणने स्पष्ट केले आहे.

तेहरानमधील एका पत्रकार परिषदेत इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई म्हणाले आम्ही सध्या अमेरिकेशी कोणतीही वाटाघाटी करत नाही आहोत. यावर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, इराणचे नेतृत्व अत्यंत दुतोंडी आहे. आधी ते भेटीसाठी विनवणी करतात आणि नंतर उघडपणे सांगतात की कोणतीही चर्चा होत नाहीये. ट्रम्प पुढे म्हणाले की संभाव्य हल्ल्याच्या वृत्तामुळे इराण अस्वस्थ झाला आहे. हा हल्ला दुस-या महायुद्धानंतरचा सर्वात मोठा आणि तीव्र हल्ला असेल. आपल्याला होर्मुझची सामुद्रधुनीबाबत चर्चा करायची आहे.

विशेष म्हणजे, अमेरिकेशी चर्चा फेटाळली असली तरी, सागरी सुरक्षेसाठी इराण आणि ओमान यांच्यात थेट वाटाघाटी सुरू आहेत. या चर्चेत कोणत्याही तिसऱ्या देशाचा सहभाग नाही. अहवालानुसार, प्रस्तावित करारात अनेक महत्त्वाच्या मुद्यांचा समावेश असू शकतो.

पर्शियन आखाताच्या प्रवेशद्वारावर असलेली होर्मुझची सामुद्रधुनी जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. फेब्रुवारीमध्ये युद्ध सुरू होण्यापूर्वी, जगातील सुमारे २० टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक याच मार्गाने होत होती. इराणच्या हल्ल्यांमुळे हा मार्ग सध्या बंद असून, इराण-ओमान करार यशस्वी झाल्यास चालू युद्ध संपण्याचा मार्गही मोकळा होऊ शकतो.

# दगडी चाळ टोळी पोलिसांच्या हाती लागेना...!

## घटनेतील आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद, आरोपींचा शोध घेने शहर गुन्हे शाखा व खापरखेडा पोलिसांसमोर आवाहन



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

मुख्य बाजारपेठेत रविवारी रात्री हातात तलवारी चाकू आणि फावडे घेऊन दहशत पसरवणाऱ्या दगडी चाळ टोळीतील दोन तडीपार आरोपीसह दोन डझनाहुन अधिक आरोपी खापरखेडा पोलीस व शहर गुन्हे शाखेला ४८ तासांनंतरही हाती लागले नाही घटनेतील आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून आरोपी मोकाट असल्याने खापरखेडा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

१ ऑगस्ट रोजी सुमित व डग्गम यांचा दगडी चाळ टोळीतील सदस्यांशी वाद झाला होता यानंतर दगडी चाळ टोळीतील विक्रम व सुदामा यांच्याशी हाणामारी झाली. या वादाचा कायमचा काटा काढण्यासाठी तडीपार आरोपी सूरज कावळे आणि शुभम उर्फ शेरू उईके यांनी कट रचला यासाठी वाडी, कन्हान, रेशीमबाग आणि खापरखेडा परिसरातून तब्बल ४० ते ५० गुंडांना बोलावण्यात आले होते.

दगडी चाळ टोळीचे मुख्य टार्गेट सुमित व डग्गम होते मात्र रविवारी रात्री मातामाय मंदिराजवळ हिमांशू कडू व त्याचे दोन मित्र दिसताच टोळीने त्यांच्यावर तलवारी, चाकू आणि फावड्याने प्राणघातक हल्ला केला जीव वाचवण्यासाठी हिमांशू पौणिकर गल्लीतून घराकडे धावत जात असताना दुचाकीने आरोपीने पाठलाग केला हा संपूर्ण थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. हिमांशू कडू व त्यांच्या मित्रांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही केवळ एक रील्स व्हिडिओ व्हायरल केल्याच्या कारणावरून प्राणघातक हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे. हिमांशूला रक्ताच्या थारोळ्यात पाडून आरोपी वॉर्ड क्र.२ मधील चर्च गल्ली, कोराडी रोड टी-पॉइंट सेजल बार मार्गे पसार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सदर घटनेचे तीव्र पडसाद उमटल्यानंतर मंगळवार ४ ऑगस्टला नागपूर शहर गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त दीपक अग्रवाल, अप्पर पोलीस आयुक्त राजेंद्र दाभाडे व उत्तर प्रादेशिक विभागाच्या अप्पर पोलीस आयुक्त विनिता शाहू यांनी घटनास्थळाची पाहणी केली. या वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी खापरखेडा पोलिसांची कानउघडणी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

मुख्य बाजारपेठेतील देवा टी स्टॉलवर मोठ्या प्रमाणात गुन्हेगार प्रवृत्तीचे गुन्हेगार दिसून येतात याठिकाणी अनेकदा गुन्हेगारांची भांडणे झाली आहेत दररोज रात्री १० वाजेपर्यंत देवा टी स्टॉल सुरू राहते मात्र घटनेच्या दिवशी सायंकाळी ७ वाजता का बंद करण्यात आला? बंद करण्यासाठी कुणी टीप दिली होती दगडी चाळ टोळी व टी स्टॉल चालकाचा काही संबंध आहे का? याचा तपास पोलिसानी केल्यास मोठे वळण मिळण्याची शक्यता आहे.

२ ऑगस्ट रविवारला रात्रीच्या सुमारास खापरखेडा मुख्य बाजारपेठेत झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा व्हिडिओ इन्स्त्राग्राम सह सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला त्यामूळे दहशतीचे निर्माण झाले आहे यासंदर्भात योग्य चौकशी करून घटनेचा व्हिडिओ व्हायलर करणाऱ्या व्यक्तीवर आयटी अँक्टनुसार तात्काळ गुन्हा नोंदवून कडक कारवाई करण्याची मागणी कायदेशीर सल्लागार राजेश चव्हाण यांनी केली आहे.

# ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट, परवानेही रद्द!

**मुंबई :** राज्यात शाळेबाहेर सकस आहाराचे आदेश दिले आहेत, त्याचे पालन सुरू आहे. फूड सेफ्टी आयुक्तांना लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने काही काळासाठी किंवा वेळेसाठी बंदी घालण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर बंदी घालण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले. ॲनालॉग पनीर म्हणून नॉन डेरी पनीर विकल जाते. त्याचे विपरीत परिणाम लक्षात घेऊन राज्यात ३० जुलै रोजी नोटीफिकेशन काढून उत्पादन प्रक्रिया, साठवणूक वाहतूक आणि विक्रीवर बंदी घालण्यात आली असून, ५५ कोटींचे ॲनालॉग पनीर नष्ट केल्याचे मुंढे यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ॲनालॉग पनीरवर एका वषार्साठी बंदी आहे, पुढे लागली तर ही बंदी वाढविली जाईल, असेही मुंढेंनी स्पष्ट केले. विभागाकडे अनेक तक्रारी होत्या, त्यावर चचार्देखील सविस्तर झाली. विधिमंडळ सभागृहातही चर्चा झाली. त्यानंतर मार्केटमधून पनीरचे ३०८ नमुने घेतले होते. त्यामध्ये ८९ सबस्टँडर, ३८ असुरक्षित आढळले. ३२ टक्के नमुन्यांमध्ये सुरक्षितता नसल्याचे समोर आले, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली. पनीर हा दुधाचा पदार्थ आहे. पण ॲनालॉग पनीरमध्ये नॉन दुग्धजन्य पदार्थ आढळले. अशा स्थितीत लोकांची दिशाभूल होते म्हणून असे आदेश दिले आहेत. छुप्या पद्धतीने हे ॲनालॉग विकले जाऊ नये, म्हणून हा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे सगळे आदेश उत्पादक प्रक्रिया करणारे, वाहतूकदार, वितरक, विक्रेते यांच्यावर बंधनकारक आहेत. त्यामुळे हॉटेलही ॲनालॉग वापरू शकत नाहीत. या ॲनालॉग पनीरमध्ये प्रोटीनपेक्षा वनस्पती चरबी आढळली आहे, स्निग्धांश जास्त आहेत, म्हणून हे आदेश काढण्यात आले आहेत. अनॉलॉग पनीरसाठी कोणतेही स्टँडर्ड नाही, अशी माहिती मुंढे यांनी पत्रकार परिषदेतून दिली. आम्ही ३०८ ठिकाणांवरून पनीरचे नमुने घेतले होते, त्यातील ३५ टक्के नमुने घातक होते. आता आगामी काळात विशेष मोहीम राबवणार आहोत, जिथे गोदामे आहेत, तिथे तपासणी होणार आहे.

# अमरावतीत भरधाव ट्रकने कामगारांना चिरडले, तिघांचा जागीच मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील सावर्डीजवळ भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये तिघांचा मृत्यू झाला आहे. भरधाव ट्रकने कामगारांना चिरडले. यामध्ये चालकासह तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर तिघेजण गंभीर जखमी आहेत. रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू असताना हा अपघात झाला आहे.

अमरावती नागपूर राष्ट्रीय



महामार्गावर सावर्डी नजीक असलेल्या रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ झालेल्या भीषण अपघातात ट्रक चालकासह तिघांचा जागीच मृत्यू झाला तर तिघे गंभीर जखमी झाले आहेत. महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू असताना हा भीषण अपघात घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आयआरबी कंपनीच्या वतीने राष्ट्रीय महामार्गावर खड्डे बुजविण्याचे काम सुरू होते.

भरधाव ट्रक अचानक अनियंत्रित होऊन उभ्या ट्रकवर जोरदार आदळला. धडकेनंतर ट्रकने रस्त्यावर काम करणाऱ्या कामगारांनाही फरफटत नेले. या भीषण अपघातात ट्रक चालक शिवचंद श्रीराम पाल, याच्यासह मुकुंदराव गणोरकर आणि देविदास पाटील (वय 53, दोघेही रा. चित्तूर, ता. आष्टी, जि. वर्धा) यांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले आहे.



संपादकीय लेखणीतून...

## हातमाग: निसर्गाशी नाळ जोडणारे जुने क्षेत्र

हातमाग क्षेत्र हे आपल्या देशाच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे आणि आपल्या देशातील ग्रामीण आणि अर्ध-ग्रामीण भागातील उदरनिर्वाहाचा महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे. हे एक असे क्षेत्र आहे जे प्रत्यक्ष महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करते कारण यात ७० टक्क्यांहून अधिक विणकर आणि संबंधित कामगार महिला आहेत. निसर्गाशी नाळ जोडलेल्या या क्षेत्रात भांडवल आणि उजेर्ची आवश्यकता अतिशय कमी असल्यामुळे ही पर्यावरणास अनुकूल अशी उत्पादन प्रक्रिया आहे. जलद गतीने बदलणारे फॅशन ट्रेंड आणि ग्राहकांच्या आवडीची गरज पूर्ण करण्यासाठी या क्षेत्रात नवीन मागणीप्रमाणे बदल करण्याची क्षमता आहे.

दि.७ ऑगस्ट १९०५ रोजी सुरू करण्यात आलेल्या स्वदेशी चळवळीने स्वदेशी उद्योगांना आणि विशेषतः हातमाग विणकरांना प्रोत्साहन दिले होते. त्यावर्षी भारत सरकारने दरवर्षी ७ ऑगस्ट हा राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.७ ऑगस्ट २०१५रोजी चेन्नई येथे पहिल्या राष्ट्रीय हातमाग दिनाचे उद्घाटन केले होते. या दिवशी आपण आपल्या हातमाग विणकाम समुदायाचा सन्मान करतो आणि आपल्या देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात या क्षेत्राचे योगदान अधोरेखित करतो. आपल्या हातमागाच्या वारशाचे संरक्षण करण्यासाठी आणि हातमाग विणकर आणि कामगारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या उत्कृष्ट कारागिरीचा अभिमान निर्माण करण्यासाठी आम्ही आमच्या संकल्पाचा पुनरुच्चार करतो. हातमाग म्हणजे हातांनी, हातपाय दोन्ही वापरून चालविता येणारा माग आहे. माग हे वस्त्र विणण्यासाठी वापरण्यात येणारे एक उपकरण- यंत्र आहे. सुताचे उभे धागे ताणात ठेवून आडव्या धाग्यांनी विणणे हे याचे काम आहे. मागाच्या आकारात, आकारमानात व यांत्रिकीत भौगोलिक क्षेत्रानुसार काही बदल असू शकतात, परंतु, त्याचे पायाभूत काम वर दिल्याप्रमाणेच असते. महाराष्ट्रातील इचलकरंजी हे शहर हातमाग या उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. हातमाग उद्योग हा हातमागाच्या साहाय्याने विणकाम करून कापड बनविण्याचा उद्योग होय. विणकामाच्या या पद्धतीत ताणा (उभे) व बाणा (आडवे) अशी संरचना वापरून कापड तयार करतात. ताण्याच्या समांतर लांब धाग्यांत त्यांना काटकोनात असलेले बाण्याचे धागे गुंतविले जातात. हे धागे गुंतविण्याचे काम ज्या चौकटींत घडवितात, तिला माग असे म्हणतात. मागांचे मुख्यतः स्वयंचलित-यंत्रमाग) व मनुष्यबळ संचलित असे दोन प्रकार आहेत. मनुष्यबळ संचलित मागात ओढमाग व हातमाग यांचा समावेश होतो.

राष्ट्रीय हातमाग दिन साजरा करण्यामागे स्वातंत्र्यापूर्वीची ही घटना ठरली कारणीभूत- दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस भारतात राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा स्पष्ट उद्देश हातमागाच्या उत्पादनांना आणि ते बनवणाऱ्या कारागिरांना प्रोत्साहन देणे हा आहे, पण या दिवसाच्या उत्सवाची सुरुवात कशी झाली आणि त्याचे महत्त्व काय आहे, याबद्दल जाणून घेऊया. देशातील हातमाग उद्योगाला सक्षम बनवण्याच्या आणि हातमागांना जगभरात मान्यता मिळावी या उद्देशाने साजरा केला जातो. हातमाग हा आपल्या भारताच्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे. कपड्यांपासून घराच्या सजावटीपर्यंत हातमागाचा आता विशेष समावेश केला जात आहे. त्यामुळे या उद्योगात रोजगार वाढला असून कारागिरांची स्थितीही सुधारत आहे. मोठ्या संख्येने लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच हातमागामुळे महिलांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळते. आपल्या देशात अशी अनेक राज्ये आहेत, जी विशेषतः हातमागांसाठी ओळखली जातात. यामध्ये आंध्र प्रदेशची कलमकारी, गुजरातची बांधणी, तामिळनाडूची कांजीवरम आणि महाराष्ट्राची पैठणी, मध्यप्रदेशची चंदेरी, बिहारची भागलपुरी रेशीम असे काही हातमाग आहेत, ज्यांची जगभरात ख्याती आहे.

हातमागाचा इतिहास- सन १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीची घोषणा केली. त्याच दिवशी कोलकात्याच्या टाऊन हॉलमध्ये मोठ्या जाहीर सभेने स्वदेशी चळवळीची सुरुवात झाली. या घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी ७ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय हातमाग दिन साजरा केला जातो. ७ ऑगस्ट २०१५ रोजी पंतप्रधानांनी या दिवसाची सुरुवात केली होती. तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. यंदा २०२४मध्ये १०वा हातमाग दिन साजरा केला जाईल. हातमाग दिन का साजरा केला जातो? तर हातमाग दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, हा आहे. याशिवाय, विणकर समाजाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आणि भारताच्या सामाजिक-आर्थिक विकासातील त्यांच्या योगदानाचे कौतुक करण्याच्या उद्देशाने हातमाग दिन साजरा केला जातो. हातमागापासून बनवलेल्या वस्तू देशाच्या कानाकोपऱ्यात आणि परदेशात पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे भारताला वेगळी ओळख मिळेल, तसेच विणकर समाजालाही पुढे जाण्याची संधी मिळेल.

# पर्यावरणाचे रक्षण आणि कायदेविषयक सुसंवाद: सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

देशातील शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही आघाड्यांवर अत्यंत दूरगामी परिणाम करणारा एक ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाने २९ जुलै २०२६ रोजी दिला आहे. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने केंद्र सरकारचे २०२१ चे 'कार्यालयीन ज्ञाप' पूर्णपणे रद्दबातल ठरवले आहे. या ऐतिहासिक निकालामुळे यापुढे कोणत्याही नवीन प्रकल्पाला पर्यावरण मंजुरीशिवाय काम सुरू करता येणार नाही, हे आता कायदेशीररीत्या स्पष्ट झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने २९ जुलै २०२६ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निकालात केंद्र सरकारचा २०२१ चा प्रशासकीय आदेश रद्द केला आहे, ज्याअन्वये पर्यावरण मंजुरीशिवाय सुरू झालेल्या प्रकल्पांना पिछली तारीख किंवा पूर्वलक्ष्यी प्रभावाने मंजुरी देण्याची कायमस्वरूपी मुभा देण्यात आली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, पर्यावरणाला आधी नुकसान पोहोचवून नंतर मंजुरी घेण्याची सरसकट पद्धत कायदेशीररित्या स्वीकारली जाणार नाही.

या वादाची पाळेमूळें केंद्र सरकारने ७ जुलै २०२१ रोजी जारी केलेल्या एका कार्यालयीन आदेशात होती. या आदेशानुसार, जर एखाद्या कंपनीने पर्यावरण विभागाची पूर्वपरवानगी न घेता प्रकल्पाचे काम सुरू केले किंवा ते पूर्ण केले, तर त्यांना नंतरच्या काळात पूर्वलक्ष्यी प्रभावाने) मंजुरी मिळवण्याची प्रशासकीय सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.

या शिथिलतेमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचा आक्षेप घेत देशभरातून विविध पर्यावरण संस्था आणि कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अशा एकूण ४९ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सलग ६ दिवस मॅरेथॉन सुनावणी झाली. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण करून न्यायालयाने १ एप्रिल २०२६ रोजी आपला निकाल राखून ठेवला होता, जो अखेर २९ जुलै २०२६ रोजी जाहीर करण्यात आला.

खंडपीठाने निकाल देताना स्पष्ट केले की, निसर्गाचे एकदा नुकसान झाल्यानंतर केवळ प्रशासकीय पत्रांचा आधार घेऊन ते नंतर वैध ठरवण्याची पद्धत कायदेशीररीत्या स्वीकारार्ह नाही.

न्यायालयाने आपले निकष स्पष्ट केले आहेत की, नवीन प्रकल्पांना पूर्वमंजुरी बंधनकारक कोणत्याही नवीन प्रकल्पाचे काम पर्यावरण विभागाच्या अधिकृत परवानगीशिवाय सुरू करता येणार नाही. 'आधी प्रकल्प आणि नंतर मंजुरी' हा प्रकार आता पूर्णपणे बंद होईल.

जुन्या प्रकल्पांना अभय, न्यायालयाने हा निकाल पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू न करता केवळ 'भविष्यासाठी' लागू केला आहे. याचा अर्थ २९ जुलै २०२६ पूर्वी ज्या प्रकल्पांनी जुन्या नियमांनुसार मंजुरी मिळवली आहे किंवा ज्यांचे काम आधीच सुरू आहे, ते पाडले जाणार नाहीत. यामुळे हजारो कोटींची गुंतवणूक असलेल्या प्रकल्पांना कायदेशीर संरक्षण मिळाले आहे.

प्रशासकीय आदेशांना चापः केंद्र सरकार केवळ एका साध्या कार्यालयीन पत्राद्वारे पर्यावरणाचे नियम शिथिल करू शकत नाही. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत आणि व्यापक जनहितासाठी अशी सवलत द्यायची असल्यास, सरकारला 'पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६' अंतर्गत रीतसर वैधानिक अधिसूचना काढावी लागेल आणि तीही केवळ मर्यादित कालावधीसाठी एकदाच लागू करता येईल.

न्यायालयाचा विशेष अधिकार : संविधानातील 'अनुच्छेद १४२' अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाने स्वतःचा विशेष अधिकार अबाधित ठेवला आहे. अत्यंत महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय हिताच्या प्रकल्पांना विशेष परिस्थितीत काम पूर्ण झाल्यानंतरही मंजुरी देण्याचा अधिकार केवळ न्यायालयाकडे असेल.

न्यायालयाने आपल्या निकालात 'पूर्वसावधगिरीच्या तत्त्वाचा' विशेष उल्लेख केला आहे. पर्यावरणाची हानी झाल्यानंतर केवळ दंड भरून किंवा फी देऊन ती भरून काढता येत नाही. डोंगरांचे झालेले उत्खनन, नद्यांचे बदललेले प्रवाह किंवा नष्ट झालेली जंगले ही केवळ कागदोपत्री दंड भरून पूर्ववत करता येत नाहीत, त्यामुळे प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच त्याची तपासणी होणे अनिवार्य आहे, यावर न्यायालयाने भर दिला.

कॉर्पोरेट आणि उद्योग क्षेत्रावर होणारा परिणाम होऊ नये यासाठी या निकालामुळे आता कॉर्पोरेट क्षेत्राला आपल्या प्रकल्पांचे नियोजन अधिक शिस्तीत करावे लागेल. यापूर्वी अनेक कंपन्या परवानगी मिळण्यापूर्वीच घाईघाईने काम सुरू करत असत आणि नंतर प्रशासकीय पळवाटा शोधत असत. आता कंपन्यांना प्रकल्प सुरू करण्यापूर्वीच 'पर्यावरणीय आघात मूल्यमापन' प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. यामुळे प्रकल्पांच्या सुरुवातीच्या काळात काहीसा वेळ लागू शकतो, परंतु भविष्यातील कायदेशीर कटकटी आणि प्रकल्प अर्धवट लटकण्याचा धोका पूर्णपणे टळेल.

**स्थानिक पर्यावरण आणि समुदायांना संरक्षणः**

हा निकाल देशातील नदी, नाले, डोंगर आणि जंगलांच्या कडेला राहणाऱ्या स्थानिक समुदायांसाठी अत्यंत दिलासादायक आहे. अनेकदा स्थानिक लोकांचा विरोध डावलून किंवा पर्यावरण परवानग्या प्रलंबित ठेवून प्रकल्प उभे राहायचे. आता कडक नियमांमुळे डोंगर कटिंग, झाडांची बेकायदेशीर कत्तल आणि जलस्त्रोतांचे प्रदूषण यावर मोठ्या प्रमाणात आळा बसेल.

शाश्वत विकासाचा हा नवा कायदेशीर रोडमॅप तयार करून सर्वोच्च न्यायालयाचा हा ऐतिहासिक निकाल केवळ पर्यावरणाची बाजू घेणारा नसून, तो भारताच्या भविष्यातील शाश्वत विकासाची नवी पायाभरणी करणारा एक परिपक्व दस्तऐवज आहे. न्यायालयाने हा निकाल 'पूर्वलक्षी' न ठेवता 'भविष्यासाठी' लागू करून एक अत्यंत प्रगल्भ कायदेशीर समतोल साधला आहे; ज्यामुळे आधीच सुरू असलेल्या हजारो कोटींच्या प्रकल्पांना अभय मिळाले असून देशाच्या आर्थिक गतीला आणि रोजगार निर्मितीला कोणताही धक्का बसणार नाही. दुसरीकडे, भविष्यातील सर्व नवीन प्रकल्पांसाठी पर्यावरण मंजुरी आधीच घेणे बंधनकारक केल्यामुळे कॉर्पोरेट क्षेत्रातील पळवाटा आणि मनमानी कारभाराला कायमचा चाप बसला आहे. निसगार्चे एकदा नुकसान झाल्यावर केवळ कागदोपत्री दंड भरून ते वैध ठरवण्याची पद्धत आता इतिहासजमा झाली असून यामुळे जंगले, डोंगर आणि जलस्त्रोतांचे प्रभावी रक्षण होईल.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे केवळ पर्यावरणाचा विजय नाही, तर तो देशाच्या शाश्वत विकासाचा नवा रोडमॅप आहे. चालू प्रकल्पांना धक्का न लावल्यामुळे देशाच्या आर्थिक गतीला खिळ बसणार नाही, तर दुसरीकडे नवीन प्रकल्पांसाठी कडक नियम केल्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी निसर्गाचे रक्षण होईल. सर्वोच्च न्यायालयाने या निकालाद्वारे भारताला "निसगार्चा बळी न देता, भविष्यातील पिढ्यांचे हक्क अबाधित ठेवून विकास साधण्याचा" एक अत्यंत व्यावहारिक आणि कायदेशीर मार्ग दाखवून दिला आहे.

- ९५६१५९४३०६

# २०२६ मध्ये वेगाची चक्रे: एकदिवसीय क्रिकेटवर गोलंदाजांचे नवं साम्राज्य आणि नाहिद राणाचा ऐतिहासिक थरार !

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

चौकार आणि षटकारांचा पाऊस, फलंदाजांचे तुफानी फटके आणि असहाय्य दिसणारे गोलंदाज आधुनिक एकदिवसीय क्रिकेटची हीच ती ओळख बनली होती. पण २०२६ हे वर्ष क्रिकेटच्या इतिहासात एका वेगळ्या वळणावर येऊन ठेपले आहे. यंदा फलंदाजांच्या दांडपट्टयाला वेसण घालत गोलंदाजांनी मैदानावर आपले अढळ साम्राज्य प्रस्थापित केले आहे. मैदानावरची लाल आणि पांढरा चेंडू जेव्हा फलंदाजांच्या यष्ट्यांचे तुकडे उडवते, तेव्हाचा थरार काय असतो, याचा प्रत्यय यंदा जगभरातील क्रिकेटप्रेमींना येत आहे. नुकत्याच समोर आलेल्या आकडेवारीनुसार, यंदाच्या वर्षात आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटमध्ये अशा काही स्पेलची नोंद झाली आहे, ज्यांनी केवळ सामनेच फिरवले नाहीत तर क्रिकेटच्या नकाशावर नवा इतिहास लिहिला.

**बांगलादेशचा 'रॉकेट' नाहिद राणा आणि त्याचा खळबळजनक स्पेल**

या संपूर्ण वर्षातील गोलंदाजांच्या कामगिरीचा लेखाजोखा घेतला, तर एकाच नावाचा डंका जगभरात वाजताना दिसतोय. तो म्हणजे बांगलादेशचा २१ वर्षीय प्रचंड वेगाचा गोलंदाज नाहिद राणा ! १४५ किमी प्रतितास पेक्षा जास्त वेगाने चेंडू फेकणाऱ्या या तरुणाने यंदा विरोधी संघांच्या फलंदाजांची अक्षरशः झोप उडवली आहे.

६ जुलै २०२६ ची ती सायंकाळ हरारेच्या मैदानावर झिम्बाब्वेचा संघ कधीच विसरू शकणार नाही. नाहिद राणाने टाकलेला प्रत्येक चेंडू जणू अग्निबाणासारखा फलंदाजांच्या दिशेने येत होता. अवघ्या १० षटकांच्या स्पेलमध्ये त्याने २.१० च्या अविश्वसनीय इकॉनॉमीने २१ धावा देत ६ फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. २०२६ मधील ही जगातील सर्वोत्तम वैयक्तिक गोलंदाजी ठरली.

पण नाहिदचा हा दणका एवढ्यावरच थांबला नाही. तो एकापाठोपाठ एक विक्रम मोडीत काढत होता. ११ मार्च रोजी मीरपूरच्या फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर त्याने पाकिस्तानच्या भक्कम फलंदाजीला खिंडार पाडत २४ धावांत ५ बळी घेतले. तर २० एप्रिल रोजी न्यूझीलंडसारख्या तगड्या संघाविरुद्ध ३२ धावांत ५ गडी टिपले. एकाच वर्षात सर्वोत्तम १० गोलंदाजांच्या यादीत तीन वेळा आपले नाव कोरणारा नाहिद राणा हा यंदाच्या मोसमातील सर्वात घातक गोलंदाज ठरला आहे.

**असोसिएट देशांची 'जादुई' कामगिरी: क्रिकेटच्या नव्या क्रांतीची नांदी**

२०२६ च्या या गोलंदाजीच्या आकडेवारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ भारत, ऑस्ट्रेलिया किंवा न्यूझीलंडसारख्या प्रस्थापित देशांचीच मक्तेदारी राहिलेली नाही. नामिबिया, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि नेपाळ यांसारख्या असोसिएट देशांच्या गोलंदाजांनी जागतिक व्यासपीठावर आपल्या कौशल्याचा असा काही नजराणा पेश केला आहे की, दिग्गज फलंदाजही त्यांच्यापुढे पाणी भरताना दिसले.

नामिबियाच्या जेजे स्मिटने २१ जुलै रोजी उट्रेच येथे नेपाळविरुद्ध ९.५ षटकांत २७ धावा देऊन ६ बळी मिळवत वर्षातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. तर युएईच्या अजय कुमारने २७ एप्रिलला कीर्तिपूरच्या मैदानावर ओमानविरुद्ध ३५ धावांत ६ फलंदाज बाद करून तिसरे स्थान पटकावले. याच युएईच्या जुनैद सिद्दीकीने देखील ओमानविरुद्धच ४९ धावांत ६ बळी घेण्याचा करिष्मा केला.

नेपाळचा स्टार गोलंदाज करण केसीने नामिबियाविरुद्ध २९ धावांत ५ बळी मिळवून आपल्या धारदार माऱ्याची चुणूक दाखवली, तर गुलसन झाने ओमानविरुद्ध ३८ धावांत ५ गळी टिपत नेपाळचा क्रिकेटमधील वाढता दबदबा सिद्ध केला. या कामगिरीवरून हे स्पष्ट होते की, असोसिएट देश आता फक्त सहभागी होण्यासाठी नाही, तर क्रिकेट जगावर राज्य करण्यासाठी मैदानात उतरत आहेत.

**प्रसिद्ध कृष्णाचा शिस्तबद्ध मारा आणि इतर दिग्गजांचे आव्हान**

भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी २० जून २०२६ चा दिवस खास ठरला. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने आपल्या अचूक टप्प्यावरील माऱ्याने अफगाण फलंदाजीची दाणादाण उडवली. ८.२ षटकांत अवघ्या २३ धावा देत त्याने ५ महत्त्वपूर्ण फलंदाजांना बाद केले. २.७६ च्या अत्यंत किफायतशीर इकॉनॉमीसह कृष्णाने केलेली ही कामगिरी भारताच्या विजयाचा पाया ठरली. इतर महत्त्वाच्या सामन्यांवर नजर टाकल्यास, बांगलादेशच्या शोरिफुल इस्लामने १४ जून रोजी मीरपूर येथे बलाढ्य ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४८ धावांत ६ बळी घेण्याची धाडसी कामगिरी केली. न्यूझीलंडच्या जेडन लेनोक्सने १३ जुलै रोजी वेस्ट इंडिजविरुद्ध ८ षटकांत अवघ्या १९ धावा देत ५ बळी मिळवले आणि २.३७ चा इकॉनॉमी रेट राखत वेस्ट इंडिजच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. याशिवाय पाकिस्तानच्या नवोदित अराफात मिन्हासने ३० मे रोजी रावळपिंडीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३२ धावांत ५ बळी टिपत आपल्या गोलंदाजीची छाप सोडली.

**निष्कर्ष - फलंदाजांचे युग संपून गोलंदाजांचे पुनरागमन?**

२०२६ मधील एकदिवसीय क्रिकेटचा हा प्रवास पाहता, हे स्पष्ट होते की आधुनिक क्रिकेटमध्ये गोलंदाजांनी पुन्हा एकदा आपले स्थान आणि महत्त्व सिद्ध केले आहे. फिरकीचा जादूगार असो वा ताशी १४५ किमी वेगाने चेंडू टाकणारा वेगवान गोलंदाज, यंदा प्रत्येकाने फलंदाजांना चुका करण्यास भाग पाडले आहे. नाहिद राणासारख्या नव्या ता?याचा उदय, असोसिएट देशांची झेप आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा पाहायला मिळणारा गोलंदाजीचा थरार—यामुळे २०२६ चे हे वर्ष एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात खास करून वेगवान गोलंदाजांसाठी सुवर्णअक्षरांनी लिहिले जाईल, यात शंका नाही !

- ९०९६३७२०८२

# सावधान! राज्यासह देशात अतीवृष्टीचे रौद्ररूप पहाता; संभाव्य दुर्घटनांपासून स्वत:ला सांभाळा

रमेश लांजेवार
नागपूर

सध्याच्या परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतीवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग,शहरी भाग व अती दुर्गम भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते सोबतच मानवीय,वित्तीय व पशुंची हाणी मोठ्या प्रमाणात होत आहे. याकरीता प्रत्येकांनी सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले,तलाव,डोह,रोडचे खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमग्न होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव, पशुपक्षी व वित्तीय हाणीच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागते. याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय.आज जंगलतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे. परंतु मानवाच्या आरोग्यावर सुध्दा मोठा आघात करीत आहे. त्यामुळे देशात वाढती ढगफुटी, सुनामी, भुकंप, अती पाऊस,अती उष्णता इत्यादी अनेक नैसर्गिक आपदांचा सामना संपूर्ण जीवसृष्टीला करावा लागतो आहे. कारण वाढते सिमेंट रोड, शहरीकरण, औद्योगिकरण इत्यादींमुळे अनेक कारणांमुळे गावखेडे नष्ट होत आहेत.

आज प्रत्येक शहराच्या केंद्रस्थानापासून २० किलोमीटरपर्यंत शहराचे जाळे पसरल्याचे दिसून येते.यामुळे पाऊसाचे पाणी जमिनीत न जाता सरळ नदी-नाल्यांना,तलाव,धरण यांना जाऊन मिळते व अशा परिस्थितीत सर्वत्र पुरपरिस्थिती निर्माण झालेली दिसून. त्याचप्रमाणे शहरी भागात सिमेंट रोड झाले खरे पण ड्रेनेज सिस्टीमचा अभाव असल्याने राज्यासह देशातील अनेक शहर जलमग्न होतांना दिसतात व शहरात पुरपरिस्थिती निर्माण होते. असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत आणि त्याचे परिणाम भोगत सुध्दा आहोत. कारण देशातील अनेक राज्यात पावसाचे थैमान;पूर-भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे.

आताही महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली जात आहे यामुळे ७ जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या विदर्भातील तुफान पावसामुळे सहा जणांचा मृत्यू झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा-लोणी मार्गावरील कुपटी नदीच्या पुलावरून कार वाहून गेल्याने आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला.भंडारा आणि वर्ध्यात प्रत्येकी एक वाहून गेल्याने दगावले, बुलढाण्यात भिंत कोसळून महिला दगावली, भिवंडी शहरातील भोईवाडा गंगारामवाडी परिसरातील "कोहिनूर"ही धोकादायक इमारत कागदी पत्याच्या बंगल्यासारखी गुरुवारी रात्री कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत १० लोकांचा मृत्यू झाला. अशाप्रकारे राज्यात अती पावसामुळे आतापर्यंत ७६ जणांचा मृत्यू झाला तर ८१ जण गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते. म्हणजे आपण ज्याप्रमाणे निसर्गावर अत्याचार करीत आहोत त्याच्या दुप्पट तो पावसाच्या रूपात रौद्र रूप धारण करून संपूर्ण सृष्टीवर घणाघाती प्रहार करीत आहे आणि याला दोषी आपणच म्हणजे संपूर्ण मानवजाती आहे.

आज वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केल्याचे सांगितले जाते.परंतु ८० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते.कारण आपण हजारो एकर जमीनीवरील वृक्ष कटाई केली आणि त्याठिकाणी उद्योग धंदे, शहरीकरण, खाणी, औद्योगीकरण, रस्त्यांचे जाळे विणले मग वृक्षारोपण कुठे केले? जर वृक्षारोपण केले तर पाणी जमिनीत का मुरत नाही याचाही अभ्यास सरकारने करायला हवा.राजकीय पुढारी एक वृक्ष लावते आणि फोटो काढून मिडिया समोर फोटोसेशन करते ही कसली वृक्षलागवड म्हणायची! याला वृक्षलागवड म्हणता येणार नाही तर हा फक्त ड्रामा म्हणावा लागेल.

आजही राज्यासह देशातील अनेक भागात बंजार जमीन किंवा पडीत जमीन आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायलाच पाहिजे आणि त्या वृक्षांची जोपासना सुध्दा व्हायला पाहिजे. तेव्हा अती पाऊसाचा ओघ थांबविता येईल असे मला वाटते. कारण राज्यासह देशात युध्दपातळीवर वृक्षलागवड झाली नाही तर येणाऱ्या काळात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भुकंपा सारखे महाभयंकर प्रकार रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात मानवी, वित्तीय व पशुपक्षांची हाणी पोहचवू शकते यालाही नाकारता येत नाही.

अती पावसामुळे दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात,अती दुर्गम भागात विषेली साप निघतात अशीच घटना ठाण्यामध्ये ग्रामीण भागात घडली गावापासून मुख्य रस्त्याला लागण्यासाठी पक्का रस्ताच नसल्याने डोली करून दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने ५ कि. मी.वरील रूग्णालयात डोलीतून घेऊन जातांना चौथीत शिकणाऱ्या ९ वर्षीय मुलाचा झोपेत साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला अशा भयावह घटना अती पाऊसामुळे होत आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला. मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत घाटमाथा, कोकण, पुणे, सातारा, नाशिक,मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदभार्तील अनेक भागांत जोरदार पाऊसाने सर्वत्र तारांबळ उडाली.

आता पाऊस जरी ओसरला असला तरी १५ तारखेनंतर पाऊसाचा जोर जास्त वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे सर्वांनीच नदी-नाले, तलाव, धरणे, डोह, दऱ्याखोऱ्यापासुन सावध रहाने गरजेचे आहे.

हवामान खात्याने असेही वर्तवले आहे की,पुढील चार दिवसाकरीता विदर्भासह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या बाबतीत रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे म्हणजे अती पाऊसाचा धोका अजुन पर्यंत टळलेला नाही.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, ६ ऑगस्ट २०२६

# विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

## ४२७ भजनी मंडळे तीन दिवस करणार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनांचा जागर




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रबोधनात्मक विचारांचा, राष्ट्रभक्तीचा आणि मानवतेचा संदेश भजनांच्या माध्यमातून जनमानसापर्यंत पोहोचविणाऱ्या विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला बुधवारी उत्साहात प्रारंभ झाला. विदर्भाच्या विविध भागांतून तब्बल ४२७ भजनी मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला असून, पुढील तीन दिवस राष्ट्रसंतांच्या भजनांनी परिसर भक्तिमय होणार आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन नागपूरच्या



महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते श्री संताजी सभागृह, सोमवारी क्वार्टर, सक्करदरा येथे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारती विदर्भच्या अध्यक्ष कांचन गडकरी होत्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून स्पर्धेचा शुभारंभ झाला.

यावेळी मंचावर श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरीचे सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ, भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, नागपूर विद्यापीठातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनच्या विजयालक्ष्मी थोटे, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, सचिव जयप्रकाश गुप्ता, अखिल भारतीय गुरुदेव मंडळ नागपूरचे अशोक यावले, राष्ट्रसंतांच्या विचारांचे प्रचारक ज्ञानेश्वर रक्षक, नाना ढगे, राजेश कुंभलकर, नगरसेविका मंगला म्हस्के आणि संयोजक डॉ. श्रीरंग वराडपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरीचे सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ यांनी मार्गदर्शन करताना भजनी मंडळांच्या सामाजिक भूमिकेवर प्रकाश टाकला. भजनी मंडळे ही गावांची शिपाई आहेत, असे सांगत त्यांनी राष्ट्रसंतांच्या विचारांचा जागर गावागावांत करण्यासाठी भजनी मंडळांनी सातत्याने कार्यरत राहावे, असे आवाहन केले.

प्रास्ताविकातून प्रा. अनिल सोले यांनी समितीच्या विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. ज्ञानेश्वर रक्षक आणि अशोक यावले यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी केले.

### राष्ट्रसंतांच्या रचना आजही कालातीत : नीता ठाकरे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या रचना कालातीत आहेत. त्यांनी तत्कालीन समाजस्थितीवर भाष्य करताना दिलेला संदेश आजही तितकाच लागू पडतो. टीव्ही आणि मोबाईलच्या वाढत्या प्रभावामुळे युवा पिढी मूळ संस्कारांपासून दूर जात असल्याचे चित्र दिसते. अशा वेळी नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून राबविले जाणारे विविध सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रम नव्या पिढीला योग्य दिशा देण्याचे महत्त्वाचे काम करीत आहेत, असे महापौर नीता ठाकरे म्हणाल्या.

### राष्ट्रसंतांचे साहित्य प्रेरणादायी : कांचन गडकरी

अध्यक्षीय भाषणात कांचन गडकरी यांनी स्पर्धेतील सर्व भजनी मंडळांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विपुल आणि प्रेरणादायी साहित्य समाजाला दिले आहे. भजन माणसाला ईश्वराशी जोडण्याबरोबरच त्याच्यावर संस्कार करण्याचेही कार्य करते. प्रत्येक घरात भजन झाले पाहिजे. त्यातून भरकटणारी पिढी पुन्हा संस्कारांकडे वळेल आणि चांगली, सुसंस्कृत पिढी घडविण्यास मदत होईल, असे त्या म्हणाल्या.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अनिल सोले, जयप्रकाश गुप्ता, अविनाश घुशे, प्रा. राजेश बागडी, अशोक मानकर, डॉ. गौरीशंकर पाराशर, देवेंद्र यादव, शशांक खेकरे, दीपक खिरवडकर, बाळासाहेब कुळकर्णी, रेणुका देशकर, नितीन तेलगोटे, किशोर पाटील, मनीषा काशिकर, राजू कनाटे, योगेश बन, डॉ. श्रीरंग वराडपांडे, अभिजित कथले, सुजाता खांबाता, सुजाता कठवते, दर्शना नखते, धनश्री भोरकर, प्रदीप अवचट, ज्योती हराड, आदी समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## वैदिक गणितावर ७ ऑगस्टपासून त्रि-दिवसीय राष्ट्रीय परिषद

### देशभरातील दीडशे गणितज्ञ होणार सहभागी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री विश्व पुनर्निर्माण संघ आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ते ९ ऑगस्टदरम्यान भारती कृष्ण विद्या विहार, जगद्गुरू परिसर, सिव्हिल लाईन्स येथे भारतीय ज्ञान परंपरा (गणित) आणि वैदिक गणित या विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. वैदिक गणिताचे प्रणेते जगद्गुरू शंकराचार्य भारती कृष्ण तीर्थ यांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या परिसरात होणाऱ्या या परिषदेत देशभरातील सुमारे १५० गणितज्ञ, शिक्षक, संशोधक व शिक्षणतज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

७ ऑगस्ट रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. विश्व पुनर्निर्माण संघाचे अध्यक्ष कुमार काळे यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या या कार्यक्रमाला शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय संघटन मंत्री डॉ. अतुल कोठारी, विश्व पुनर्निर्माण संघाचे महासचिव शैलेश जोगळेकर हे प्रामुख्याने उपस्थित राहतील. परिषदेत शोधपत्र सादरीकरण, तांत्रिक व प्रशिक्षण सत्रे होतील. ९ ऑगस्ट रोजी व्हीएनआयटीचे संचालक डॉ. प्रेमलाल पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप होईल तर शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय संयोजक ए. विनोद यांची उपस्थिती राहील, अशी माहिती श्री विश्व पुनर्निर्माण संघाचे विश्वस्त व वैदिक गणित संयोजक श्रीकांत देशपांडे आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय संयोजक डॉ. श्रीराम चौथाईवाले यांनी दिली.

## महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या पाठपुराव्याला यश; भंडारा जिल्ह्यातील थकीत धान बोनस व मका चुकारांबाबत शासनस्तरावर हालचाली

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुंटे यांनी ७ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित विभागांना भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा थकीत धान बोनस व मका खरेदीचे थकीत चुकारे तातडीने अदा करण्याबाबत निवेदन पाठविले होते. या निवेदनाची शासनाने दखल घेत संबंधित विभागांकडून अहवाल मागविल्याने या प्रश्नावर प्रशासकीय पातळीवर हालचाल सुरू झाली आहे.

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह मार्केटिंग फेडरेशन लि., जिल्हा मार्केटिंग अधिकारी, भंडारा यांनी २९ जुलै २०२६ रोजी प्रधान कार्यालय, मुंबई यांना पाठविलेल्या अहवालात महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या निवेदनाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. तसेच निवेदनातील प्रत्येक मुद्यावर स्पष्टीकरण देत आवश्यक कार्यवाही करण्याची नोंद केली आहे.अहवालानुसार, धान उत्पादकांना जाहीर करण्यात आलेला प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस हा शासनस्तरावरील विषय असून शासनाकडून आदेश प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मका खरेदीबाबत जिल्ह्यात २,२१७ शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आली असून हमीभावानुसार एकूण देय रक्कम २१ कोटी ८३ लाख ६९ हजार ५२० रुपये आहे. यापैकी १,५२७ शेतकऱ्यांच्या खात्यात १५ कोटी ९ लाख २ हजार १६० रुपये ऑनलाईन जमा करण्यात आले असून उर्वरित प्रलंबित रक्कम शासनाकडून प्राप्त होताच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात येईल, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. रब्बी हंगामात ३,३६७ शेतकऱ्यांनी मका विक्रीसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी २,२१७ शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष खरेदी झाली. तुमसर तालुक्यात खरेदी केंद्र मंजूर असूनही एकाही शेतकऱ्याने नोंदणी न केल्याने तेथे खरेदी झाली नसल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. रेशनद्वारे मका वितरणासंदर्भातील मुद्दा हा संबंधित कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नसल्याचे जिल्हा पणन अधिकारी यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे.

याबाबत महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते भूषण कुंटे यांनी सांगितले की, "शासनाने आमच्या निवेदनाची अधिकृत दखल घेतली असून हा शेतकऱ्यांच्या लढ्याचा पहिला टप्पा आहे. मात्र, जोपर्यंत सर्व शेतकऱ्यांच्या खात्यात थकीत चुकारे आणि धान बोनस जमा होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्र शेतकरी संघटना पाठपुरावा सुरू ठेवणार आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशासाठी आवश्यक असल्यास राज्यव्यापी आंदोलनाचाही इशारा देण्यात येईल."

## श्री आयुर्वेद महाविद्यालयात अवयवदान जनजागृती अभियान संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त श्री आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा समन्वय रुग्णालय, नागपूर येथे "अवयवदान जनजागृती अभियान" अंतर्गत विशेष जनजागृती व्याख्यान व अवयवदान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या पी.जी. हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या वीणा वाठोरे Project Manager, Multi Organ Hope & Advocacy Network (MOHAN), Nagpur यांनी अवयवदानाचे सामाजिक, नैतिक व वैद्यकीय महत्त्व, ब्रेन स्टेम डेथ ही संकल्पना, अवयवदानाची संपूर्ण प्रक्रिया, तसेच अवयवदानाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले.




मृत्यूनंतर अवयवदानाद्वारे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, हा अत्यंत प्रेरणादायी संदेश त्यांनी उपस्थितांना दिला. तसेच प्रत्येक नागरिकाने अवयवदानाविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून समाजात जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बृजेश मिश्रा हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले. आपल्या मनोगतात त्यांनी अवयवदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असून, समाजात याबाबत व्यापक जनजागृती होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी अवयवदानाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रचना शारीर विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोद एम. चौधरी उपस्थित होते. त्यांनी अवयवदानाविषयी जनजागृतीसाठी वैद्यकीय विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करत, समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.यावेळी रचना शारीर विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. शिल्पा वराडे यांनी अवयवदानाची प्रस्तावना व महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना अवयवदानाचे सामाजिक उत्तरदायित्व समजावून सांगितले. तसेच डॉ. शुभांगीनी वरटकर यांनी 'अवयवदान हे श्रेष्ठदान' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अवयवदान जनजागृती कार्यक्रमात डॉ. मोना गायकवाड यांनी आपल्या जीवनातील प्रेरणादायी अनुभव कथन केला. त्यांनी सांगितले की, त्यांच्या सख्ख्या बहिणीने मूत्रपिंड दान केल्यामुळे त्यांच्यावर यशस्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण होऊन त्यांना नवजीवन मिळाले.

त्यांनी उपस्थितांना अवयवदानाचे महत्त्व पटवून देत, अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नूतन तायनाथ यांनी प्रभावीपणे केले, तर डॉ. यामिनी शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी आयोजित अवयवदान प्रदर्शनी हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. प्रदर्शनीमध्ये विविध अवयवांची माहिती, ब्रेन स्टेम डेथची संकल्पना, अवयवदानाची प्रक्रिया, प्रत्यारोपणाविषयी वैज्ञानिक माहिती तसेच अवयवदानासंबंधी जनजागृती करणारे माहितीफलक व शैक्षणिक साहित्य प्रदर्शित करण्यात आले. उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांनी प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवयवदानाविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली.

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी अवयवदानाची प्रतिज्ञा घेऊन अवयवदानाविषयी जनजागृती करण्याचा व समाजात या उदात्त कायार्चा संदेश पोहोचविण्याचा संकल्प केला. उपस्थितांनी अवयवदानाचे महत्त्व जाणून घेत सकारात्मक प्रतिसाद नोंदविला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थी, इंटर्न, पदवीचे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील रचना शरीर विभागातील पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी डॉ. गणेश सुर्वे, डॉ.शुभम झोडपे, डॉ.आदिनाथ रावते , डॉ. जयंत केवट, डॉ. जानवी यादव, डॉ. मोना गायकवाड, डॉ. निकीता सोनोने, डॉ. प्राजक्ता भालकर, डॉ. तनझिला अहमद, डॉ. पायल कारले या रचना शारीर विभागाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे विशेष सहकार्य लाभले व्याख्यानानंतर उपस्थितांच्या विविध शंकांचे समाधान करण्यात आले. अवयवदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला आणि उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

### थोडक्यात

## भूषण कुंटे यांच्या पाठपुराव्याला यश, महा-डीबीटी २.० शिष्यवृत्ती पोर्टल सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतकरी नेते भूषण कुंटे, महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय प्रवक्ते, यांनी महा-डीबीटी शिष्यवृत्ती पोर्टल तात्काळ सुरू करावे, प्रलंबित शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात वितरित करावी तसेच विद्यार्थ्यांवरील अन्याय थांबवावा, या मागण्यांसाठी मुख्यमंत्री, सामाजिक न्याय विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला अखेर यश आले असून महा-डीबीटी २.० पोर्टलवरील



नवीन व नूतनीकरण अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दि. २८ जुलै २०२६ रोजी शेतकरी नेते भूषण कुंटे यांनी मुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन व ई-मेल पाठवून महा-डीबीटी पोर्टल तात्काळ सुरू करण्याची, प्रलंबित शिष्यवृत्ती वितरित करण्याची, विद्यार्थ्यांकडून होणारी बेकायदेशीर फी वसुली थांबविण्याची आणि मूळ कागदपत्रे अडवून ठेवणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री कार्यालयाने या निवेदनाची दखल घेऊन संबंधित विभागांकडे तातडीने कार्यवाहीसाठी पाठविले होते.

आज महा-डीबीटी २.० पोर्टल सुरू झाल्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ही विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कासाठी शेतकरी नेते भूषण कुंटे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण उपलब्धी असल्याची भावना अनेक विद्यार्थी व पालकांनी व्यक्त केली आहे. यावेळी शेतकरी नेते भूषण कुंटे यांनी शासनाकडे प्रलंबित शिष्यवृत्ती व निर्वाह भत्त्याचा निधी तातडीने वितरित करावा, पोर्टलवरील उर्वरित तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि कोणत्याही विद्यार्थ्याकडून बेकायदेशीर शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पुन्हा केली. तसेच सर्व पात्र विद्यार्थ्यांनी महा-डीबीटी २.० पोर्टलवर आपले अर्ज व नूतनीकरणाची प्रक्रिया विलंब न करता पूर्ण करावी, असे आवाहनही शेतकरी नेते भूषण कुंटे यांनी केले.

## हिंदू मुलींची शाळामध्ये गुरुपूजन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, महाल येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्रथम गुरु असलेल्या पालकांचे पाद्यपूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गुरुंच्या सन्मानार्थ गीत, भाषणे, कविता आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मुख्याध्यापिका माया बमनोटे यांनी विद्यार्थ्यांना गुरुंच्या मार्गदर्शनाचे महत्त्व सांगून त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेची विद्यार्थिनी मुग्धा बोकडे हिने केले. कार्यक्रमाला गुरुजन यशोधन कारकर, धनश्री कारकर, संस्थेच्या सीमा फडणवीस यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## करिअर कट्टा इंडक्शन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृतत, नागपूर**

श्री निकेतन आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत करिअर कट्टा इंडक्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मेधा कानेटकर होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. कांचन जोशी, करिअर कट्टा समन्वयक प्रा. सारिका पाटील तसेच डॉ. मृण्मयी कानेटकर उपस्थित होत्या.

यावेळी विद्यार्थ्यांना करिअर कट्टाच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी करिअर कट्टाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## पत्रकार क्लब ऑफ नागपूर येथे ६ व ७ ऑगस्ट रोजी पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी विशेष एसआयआर कॅम्प

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना स्क्षप्रक्रियेचा लाभ सुलभपणे मिळावा, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करता यावी आणि संबंधित शंकांचे निरसन व्हावे, या उद्देशाने पत्रकार क्लब ऑफ नागपूर व टिळक पत्रकार भवन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ व ७ ऑगस्ट रोजी, सकाळी १०.३० वाजता. पत्रकार क्लब ऑफ नागपूर, सिव्हील लाईन येथे विशेष एसआयआर कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. या कॅम्पचे उद्घाटन नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांच्या शुभहस्ते दि.६ ऑगस्ट रोजी, सकाळी १०.३० वाजता होणार आहे. एसआयआर कॅम्प कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेवक विनय दाणी, नगरसेविका धनश्री देशपांडे आणि नगरसेविका पूजा पाठक हे प्रमुख उपस्थित राहतील. या दोन दिवसीय कॅम्पमध्ये पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना एसआयआर संदर्भातील आवश्यक मार्गदर्शन, कागदपत्रांची तपासणी तसेच संबंधित प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

थोडक्यात

## सेवानंद विद्यालयातील मुलांना पुस्तकांचे वाटप

### आदिनाथ युवा ब्रिगेड, आणि युवा वॉरियर्सचा उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

आदिनाथ युवा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रुद्र प्रतापसिंह ठाकुर आणि युवा वॉरियर्स च्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थी जे खूप गरीब घरची परिस्थिती असणारे, वंचित दीन दलितांच्या मुलांना १८५पुस्तकाचे वाटप करण्यात आले. प्राप्त माहितीनुसार, आदिनाथ युवा ब्रिगेड संपूर्ण भारतभर असे उपक्रम राबवत आलेली आहे. युवा ब्रिगेड राष्ट्रीय अध्यक्ष रुद्र प्रतापसिंह ठाकुर हे यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. त्यांच्या सोबतआलेले निरंजन घुरिले, सागर निमोणे, प्रशांत धोटे, प्रतिक बिरखेडे मंचावर उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक बायस्कर सर यांनी सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सर्वच गरीब विद्यार्थ्यांना कुठलीही अडचण असू देत एक कॉल करा युवा ब्रिगेड आपल्या पाठीशी उभी राहील, अशी ग्वाही यावेळी रुद्र प्रतापसिंह ठाकुर यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेश पटेल सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीते साठी ताजूल चौहान, आदित्य बैस, निखिल अतकरे, अंशुल चाचेरे, जगदीश कुकडे, आशिष कुसराम, स्पर्श जाधव, सतीश ठाकूर, तसेच विद्यालय कडून पराग सपाटे, शंकर रत्ने, सुवर्ण बोबडे, प्राजक्ता बरोकर, उज्वला गोंदुळे, संगीता चोपडे, प्रभाकर ठमके, संतोष बुंधे, मृणाली येवले, अश्विनी बर्वे, अमित राऊत मोहन रंगारी यांनी सहकार्य केले.

## सरकारी रस्त्यावरील अतिक्रमण हटवा; अन्यथा १५ ऑगस्टपासून आमरण उपोषण : विश्वनाथ मानकर

### नगर परिषदेला हस्तांतरित रस्त्यावर अतिक्रमण झाल्याचा आरोप; प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह




**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

नगर परिषदेला हस्तांतरित करण्यात आलेल्या सरकारी रस्त्याच्या जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचा आरोप करत या प्रकरणाची तातडीने चौकशी करून रस्ता पूर्ववत खुला करावा, अन्यथा १५ ऑगस्ट २०२६ पासून आमगाव नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा विश्वनाथ लक्ष्मणराव मानकर यांनी दिला आहे. त्यांनी ३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी परिसरातील अनेक महिला-पुरुष व शेतकरी उपस्थित होते. विश्वनाथ मानकर यांनी सांगितले की, गट क्रमांक ४५९/क हा त्यांच्या मालकीचा असून सन २०१२ मध्ये निवासी प्रयोजनासाठी त्याचे रूपांतर करण्यात आले. त्यापैकी गट क्रमांक ४५९/क/१ हा ये-जा करण्याच्या सार्वजनिक मार्गासाठी नगर परिषद, आमगाव (स्थानिक नियोजन प्राधिकरण) यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला असून त्याची नोंद सातबारावर आहे. या रस्त्याचा वापर परिसरातील नागरिक आणि शेतकरी गेल्या सुमारे ४० वर्षांपासून नियमितपणे करत असल्याचा दावा त्यांनी केला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, लगतच्या जैन कुटुंबाच्या जमिनीची मोजणी करण्याच्या निमित्ताने ३० जुलै २०२६ रोजी पोलीस बंदोबस्तात भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करण्यात आली. त्यावेळी सीमा निश्चित करण्याच्या नावाखाली जेसीबीच्या साहाय्याने सार्वजनिक रस्त्याच्या जागेवर खोदकाम करून अतिक्रमण करण्यात आले आणि त्यामुळे नागरिक व शेतकऱ्यांचा ये-जा करण्याचा मार्ग पूर्णपणे बंद झाला, असा आरोप त्यांनी केला. मानकर यांनी पुढे सांगितले की, जमिनीचे मोजमाप व सीमांकन करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. मात्र, त्या प्रक्रियेच्या नावाखाली सार्वजनिक रस्त्यावर कब्जा करण्यास कोणत्याही व्यक्तीस मदत करता येत नाही. या प्रकरणात संबंधित मोजणी अधिकारी आणि पोलिसांच्या उपस्थितीतच रस्त्यावर जेसीबीद्वारे खोदकाम करून बेकायदेशीर कब्जा करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

या प्रकरणात शासनाने तातडीने हस्तक्षेप करून सार्वजनिक रस्ता पूर्ववत खुला करावा, अशी मागणी करत त्यांनी इशारा दिला की, १५ ऑगस्ट २०२६ पासून नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल. तसेच, उपोषणादरम्यान आपल्या जीवितास कोणताही धोका झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शासन आणि प्रशासनाची राहील, अशी विनंतीवजा सूचना त्यांनी दिली. या वृत्तातील आरोप हे पत्रकार परिषदेत विश्वनाथ मानकर यांनी केलेल्या निवेदनावर आधारित असून संबंधित पक्ष किंवा प्रशासनाची भूमिका प्राप्त झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

## मंगला ऊर्फ आक्का पवनीकर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



जयप्रकाश नगर (युनिव्हर्सल तेजस), नागपूर निवासी श्रीमती मंगला ऊर्फ आक्का पवनीकर(७६) यांना दि. ४ ऑगस्टला देवाज्ञा झाली. शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार सहकार नगर घाटावर पार पडला. त्यांच्या मागे एक मुलगा, दोन मुली, सून, जावई व बराच मोठा आप्तपरिवार आहे. एक मनमिळावू, सर्वांना आपलेसे करणारे व्यक्तिमत्व म्हणून आक्कांची ओळख होती.

# विश्वविक्रमात देवग्रामचा झेंडा उंचावला!

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गीत गायनात अंत्योदय महाविद्यालय विद्यापीठात द्वितीय

### गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रमात ऐतिहासिक सहभाग; १२ हजारांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्राने गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील देवग्राम येथील अंत्योदय महाविद्यालयाने आपल्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेला साजेशी आणखी एक उल्लेखनीय कामगिरी नोंदवत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गीत गायनाच्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रमात विद्यापीठ स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे देवग्रामसह संपूर्ण नरखेड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.




या ऐतिहासिक कामगिरीबद्दल महाविद्यालयाला १२ हजार रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या राष्ट्रभक्ती, ग्रामविकास, सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने हा विश्वविक्रम उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमात विद्यापीठाशी संलग्न शेकडो महाविद्यालयांनी सहभाग घेतला असताना, अंत्योदय महाविद्यालयाने शिस्त, नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाच्या बळावर अव्वल कामगिरी करत द्वितीय क्रमांकावर आपले नाव कोरले. हा बहुमान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे, मत्स्य व पशुविज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास पाटील तसेच आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या उल्लेखनीय कामगिरीचे विशेष कौतुक करण्यात आले.

अंत्योदय विज्ञान संस्था व संशोधन केंद्राचे संस्थापक डॉ. भाऊसाहेब भोगे यांनी विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातून जागतिक विक्रमाच्या उपक्रमात मिळवलेले हे यश संपूर्ण संस्थेसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगितले. अंत्योदय मिशनचे अध्यक्ष डॉ. भास्कर विघे यांनीही विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि संस्थेच्या संस्कारक्षम वातावरणाचे हे फलित असल्याचे नमूद केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे, उपप्राचार्य डॉ. राजू श्रीरामे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगेश आचार्य यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी अथक परिश्रम घेतले. प्रत्येक विद्यार्थ्याने राष्ट्रसंतांच्या विचारांना स्वर देत विश्वविक्रमात आपला मोलाचा वाटा उचलला, ही बाब महाविद्यालयासाठी विशेष अभिमानाची ठरली.

अंत्योदय महाविद्यालयाने गेल्या काही वर्षांत शैक्षणिक गुणवत्ता, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक स्पर्धा, सामाजिक उपक्रम आणि विद्यार्थी विकासाच्या विविध क्षेत्रांत सातत्याने उल्लेखनीय यश मिळवत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विश्वविक्रम उपक्रमातील हे यश त्या परंपरेत भर घालणारे ठरले आहे.

या यशामुळे देवग्राम परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांकडून महाविद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारी आणि राष्ट्रीय पातळीवर झेप घेण्याची प्रेरणा देणारी ही कामगिरी असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## दिल्ली येथे कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकरिता कर्मचाऱ्यांनी एकत्र येणे काळाची गरज : कमलेश बिसेन

### महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत कर्मचारी प्रश्नांवर सखोल चर्चा; दिल्लीतील महारॅलीसाठी ३,००० प्रतिनिधींचे नियोजन करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाची राज्य कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक आज जिल्हा परिषद, नांदेड येथील कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांच्या अध्यक्षतेखाली प्रशांत जामोदे राष्ट्रीय उपाध्यक्ष यांचे प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीचे आयोजन नांदेड जिल्हा महासंघाने अत्यंत नियोजनबद्ध व भव्य स्वरूपात केले. बैठकीच्या प्रारंभी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी मंचावर प्रशांत जामोदे (राज्य कार्याध्यक्ष तथा केंद्रीय उपाध्यक्ष), संजय महाळणकर (राज्य सरचिटणीस), कैलासनाना वाघचौरे (राज्य उपाध्यक्ष), अतुल वर्मा (सल्लागार) तसेच कविता बोंद्रे (महिला उपाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोंदिया जिल्ह्यातून कमलेश बिसेन उपाध्यक्ष, संतोष तोमर सरचिटणीस प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी गोंदिया जिल्ह्यात ७,८,९ सप्टेंबर २०१८ ला कपात केलेले वेतन देणे, गोंदिया जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून घोषित करणे, कंत्राटी ग्राम पंचायत अधिकारी यांचे मानधन सेवार्थ करने, अनुकंपा नियुक्ति कंत्राटी पद्धतीने न करता नियमित वेतनवर करने, लिपिक वर्ग ची वेतन त्रुटी दूर करने, इत्यादी महत्त्वपूर्ण मागण्या विस्तृत पणे कमलेश बिसेन यांनी व्यासपीठावर मांडल्या.

बैठकीत तसेच सभागृहात कर्मचारी हिताच्या विविध प्रलंबित सेवा विषयक प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. राज्य महासंघ व अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघामार्फत करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या खर्चास मान्यता देण्यात आली. वार्षिक वर्गणी, जिल्हा महासंघ व प्रभाग संघटनांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. विविध प्रलंबित विषयांवर उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आपली मते मांडून संघटन अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीत सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील संघटनात्मक कामांचा सविस्तर आढावा सादर केला. कर्मचारी हितासाठी राज्यभर एकसंधपणे लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी दिल्ली (फरीदाबाद) येथील महासंघाच्या कार्यालयात सांस्कृतिक व शिक्षण-प्रशिक्षण समितीचे केंद्रीय अध्यक्ष म्हणून स्वतंत्र जबाबदारी व सेन भवनात कक्ष प्राप्त झाल्याबद्दल राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच केंद्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राज्य कार्याध्यक्ष प्रशांत जामोदे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल राज्य सरचिटणीस संजय महाळणकर, ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे नाशिक जिल्हा सरचिटणीस संजय गिरी तसेच नर्सेस संघटनेच्या कार्याध्यक्ष कविता बोंद्रे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

बैठकीच्या समारोपप्रसंगी राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांनी १२ डिसेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथील ऐतिहासिक रामलीला मैदानावर आयोजित भव्य महारॅलीसाठी महाराष्ट्रातून किमान ३,००० प्रतिनिधी उपस्थित राहतील, यासाठी प्रत्येक जिल्ह्याने आतापासूनच सूक्ष्म नियोजन करून संघटनात्मक तयारीला सुरुवात करावी, असे आवाहन केले. शेवटी सर्व पदाधिकाऱ्यांनी कर्मचारी हितासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करत,

"कर्मचारी एकता झिंदाबाद!"

"महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचा विजय असो!"

अशा घोषणांनी सभेचा समारोप झाला. सभेचे आभार श्री गजानन शिंदे यांनी मानले सभेच्या यशस्वीतेसाठी नांदेड जिल्हा महासंघ चे अशोक कासराळीकर, व सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## आमगाव-देवरी परिसरात विविध सामाजिक व आरोग्य उपक्रमांचे आयोजन

### आ. संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवारातर्फे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव-देवरी मतदारसंघाचे आमदार संजय पुराम यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधीलकी जपत विविध जनउपयोगी आणि आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'बिरसा फाउंडेशन पुराडा', सविता संजय पुराम आणि मित्र परिवाराच्या संयुक्त विद्यमाने ६ आणि ७ ऑगस्ट २०२६ रोजी हे उपक्रम राबवले जाणार आहेत. ६ ऑगस्टला मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व आरोग्य निदान शिबीर गुरुवार, ६ आगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हरिहरभाई पटेल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चिरचाळबांध ता. आमगाव येथे मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



कार्यक्रमाचे उद्घाटन जि. प. अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या अध्यक्षतेखाली आ. अविनाश ब्राह्मणकर यांचे हस्ते होणार आहे. ७ऑगस्टला रक्तदान शिबीर व लोकार्पण सोहळे आयोजित असून विविध विकासकामांचे लोकार्पण व भव्य रक्तदान शिबीर पार पडणार आहे. सकाळी ११ वा. डी. फार्म फार्मसी कॉलेज, आमगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे उदघाटन गोंदिया जिल्हा भाजपच्या अध्यक्ष सिताताई रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली भंडारा/गोंदिया भाजपचे संघटन मंत्री वीरेंद्र अंजनकर यांचे हस्ते होणार आहे. इतर प्रमुख कार्यक्रम ७ ऑगस्ट रोजी पुराडा येथे, सकाळी १० वाजता क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांचे पूजन, सकाळी ११ वाजता प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व वाचनालयाचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

दुपारी १२ वाजता मौजा पदमपूर/आमगाव येथे वाचनालयाचे लोकार्पण, दुपारी ३ वाजता प्राथमिक आरोग्य उपकेंद्र परिसर बोरगांव/बाजार येथे वृक्षारोपण कार्यक्रम, दुपारी ४.३० वाजता देवरी येथील आ. संजय पुराम यांच्या कार्यालयात भाजप महिला आघाडी देवरी यांच्या वतीने वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा आयोजित आहे. सर्व नागरिक, कार्यकर्ते व नागरिकांनी या सामाजिक व आरोग्यदायी उपक्रमांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सविता संजय पुराम माजी महिला व बालकल्याण सभापती, जि. प. गोंदिया, बिरसा फाउंडेशन पुराडा, व मित्र परिवारातर्फे करण्यात आले आहे.

## मानागड कालव्यालगत असलेल्या विद्या मंदिर प्रायमरी स्कूलच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर; पालक व नागरिकांमध्ये चिंता

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**

सालेकसा येथील मानागड कालव्यालगत असलेल्या विद्या मंदिर प्रायमरी स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या लहान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पालक व नागरिकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. शाळेजवळून वाहणारा मानागड कालवा सध्या पावसाळ्यामुळे पाण्याने भरलेला असून, उन्हाळ्यातही रब्बी हंगामात कालव्यात मोठ्या प्रमाणात पाणी सोडले जाते. त्यामुळे शाळेजवळील परिसर विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.






स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, शाळेजवळ लहान मुले खेळत असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी संरक्षण भिंत, मजबूत कुंपण, इशारा फलक तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

याशिवाय, शाळेतील काही वर्गखोल्या आकाराने अत्यंत लहान (सुमारे ७-७-८ फूट) असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. या वर्गखोल्यांमध्ये नैसर्गिक हवा व प्रकाशाचे योग्य नियोजन नसल्याने विद्यार्थ्यांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागतो. तसेच वर्गखोलीतील आवाज घुमत राहिल्याने शिक्षक शिकवत असलेले धडे विद्यार्थ्यांना स्पष्टपणे ऐकू येत नाहीत व त्याचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची तक्रार पालकांनी केली आहे.

काही नागरिकांनी असा आरोपही केला आहे की, शाळेकडे जाण्याचा मार्ग खासगी दवाखान्याच्या परिसरातून असून विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने हा प्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज आहे. तसेच शाळेची जागा आणि परिसर लहान मुलांसाठी अधिक सुरक्षित असावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या सर्व बाबींची शिक्षण विभागाने, स्थानिक प्रशासनाने व संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून शाळेतील सुरक्षा व्यवस्था, वर्गखोल्यांची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध मूलभूत सुविधांची तपासणी करावी, तसेच आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी पालक व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

थोडक्यात

## पारवे महाविद्यालयात महिला सशक्तीकरण समितीची स्थापना



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पारवे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला सशक्तीकरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी महाविद्यालयात महिला सशक्तीकरण समितीची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाला ठाणेदार रवींद्र मस्कर, संस्थेच्या सहसचिव दीपाली पारवे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. गोसावी, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य केसकर, उपप्राचार्य भूमी तसेच जी.एन.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्या चारुलता गुलघाणे प्रमुख उपस्थित होत्या. ठाणेदार मस्कर यांनी विद्यार्थिनींना महिला संरक्षणासंदभार्तील कायदे, स्वसंरक्षणाचे महत्त्व आणि सायबर सुरक्षेच्या उपाययोजनांविषयी मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा वापर करताना सतर्क राहण्याचे तसेच ऑनलाइन फसवणुकीपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रा. वैशाली राऊत यांच्या समन्वयातून महिला सशक्तीकरण समितीची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पुनम गोंडी-मेश्राम यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा. परशुराम कर यांनी केले.

यावेळी प्रा. इशिका फुलजले, डॉ. संगीता चव्हाण, राकेश वाघमारे, प्रकाश देवीकर, मोहिनी डुकरे, आशिष बिसने यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. रिशिका शिरामे, ग्रंथाली शेरकी, अश्विनी चंदेल, सरिता मारबते, आचल बावनकर, प्राची मोरे, तेजल बनकर आणि साक्षी गडमडे यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

## 'नूतन आदर्श' महाविद्यालयाची जागतिक विक्रमात सुवर्ण कामगिरी

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सामूहिक गीतगायन स्पर्धेत नागपूर ग्रामीण विभागात प्रथम क्रमांक**




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

आयडियल एज्युकेशन सोसायटी संचालित नूतन आदर्श आर्ट्स, कॉमर्स आणि श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय, उमरेड यांनी शैक्षणिक गुणवत्तेसह सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत आणखी एक मानाचा तुरा आपल्या शिरपेचात खोवला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे आयोजित ऐतिहासिक सामूहिक गीतगायन उपक्रमात उत्कृष्ट सहभागाची नोंद करत महाविद्यालयाने नागपूर जिल्हा ग्रामीण विभागातून प्रथम पारितोषिक पटकावले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठाने "या भारतात बंधुभाव नित्य वसू दे" या विद्यापीठ गीताच्या भव्य सामूहिक गायनाचे आयोजन केले होते. या उपक्रमासाठी ५२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५ हजारांहून अधिक विद्यार्थी नागपूर येथील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाजवळील मैदानावर प्रत्यक्ष उपस्थित राहिले, तर १५ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन माध्यमातून सहभाग नोंदविला.

बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाची दखल गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया या चार प्रतिष्ठित जागतिक विक्रम संस्थांनी घेतली असून या ऐतिहासिक उपक्रमाची जागतिक विक्रमांमध्ये नोंद झाली आहे. या विश्वविक्रमात नूतन आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय सहभाग, प्रभावी नियोजन आणि शिस्तबद्ध आयोजन याची दखल घेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने महाविद्यालयाला नागपूर जिल्हा ग्रामीण विभागातील प्रथम पारितोषिक प्रदान केले. या यशामागे महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना, महिला विकास कक्ष, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे सामूहिक परिश्रम आणि उत्कृष्ट समन्वय असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याची पुन्हा एकदा राज्यस्तरावर दखल घेतली जात असून विविध स्तरांतून संस्थेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. अर्चना चौधरी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. लोमेश बावनकुळे, हस्ते डॉ मनाली क्षिरसागर,कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ नितीन पाटील कुलगुरू, महाराष्ट्र मत्स्य,आणि पशु विज्ञान विद्यापीठ नागपूर, डॉ. अखिलेश पेशवे, प्र. कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. विजय खंडाळ, प्रभारी कुलसचिव, मा. आशिष देशमुख- आमदार सावनेर यांची उपस्थिती होती. यावेळी आय. क्यू. ए. सी. समन्वय डॉ. संजीव कोंडेकर, माजी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. विनयकुमार उपाध्याय, प्रा. विनोद मांडवकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपेश खुबालकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक आणि समस्त प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य होते.

# झाडीपट्टी रंगभूमीवरील कलावंतांना वार्षिक ५० हजार रुपयांचे अनुदान

### सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या निर्णयाचे राज्यभर स्वागत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी राज्य शासन सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून झाडीपट्टी रंगभूमीवरील कला पथकांना दरवर्षी ५० हजार रुपये अनुदान देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री आशिष शेलार यांनी जाहीर केला आहे. या निर्णयामुळे विदभार्तील झाडीपट्टी रंगभूमीशी निगडित कलावंतांना आर्थिक आधार मिळण्यासह या समृद्ध लोकनाट्य परंपरेच्या जतन व संवर्धनाला मोठी चालना मिळणार आहे.

झाडीपट्टी रंगभूमी ही विदर्भाच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग असून, अनेक दशके ग्रामीण भागात सामाजिक प्रबोधन, लोकसंस्कृतीचे संवर्धन आणि मनोरंजनाचे प्रभावी माध्यम म्हणून कार्यरत आहे. या रंगभूमीवरील अनेक कलावंतांनी आपल्या कलेद्वारे लोकपरंपरा जिवंत ठेवण्याचे मोलाचे कार्य केले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे अशा कलावंतांच्या कायार्ला योग्य सन्मान मिळण्याबरोबरच त्यांच्या आर्थिक स्थैयार्लाही बळ मिळणार आहे.

राज्य शासन लोककला आणि लोककलावंतांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, विविध लोककला प्रकारांचे संवर्धन, कलाकारांना आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण, नोंदणी आणि प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. झाडीपट्टी रंगभूमीवरील कलावंतांसाठी जाहीर करण्यात आलेले हे वार्षिक अनुदान त्या प्रयत्नांना अधिक बळ देणारे ठरणार आहे.




या निर्णयाचे झाडीपट्टी रंगभूमीवरील कलावंत, सांस्कृतिक संस्था, कला रसिक तसेच विदभार्तील नागरिकांकडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे झाडीपट्टी रंगभूमीच्या जतन, संवर्धन आणि विकासाला नवी चालना मिळेल, तसेच लोककलावंतांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणास बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे, अभिजात कला, लोककला आणि थोर कलावंतांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

धनवटे सभागृह, शंकरनगर येथे आज कार्यक्रम आयोजित केला गेला त्यात मंचावर माननीय सांस्कृतिक मंत्री एड. आशिष जी शेलार, अमर कुलकर्णी पद्मश्री प्राप्त झाडीपट्टी रंगभूमीचे परशुराम खुणे, झाडीपट्टी निर्मिती संघाचे अध्यक्ष परमानंद गहाणे, मध्यवर्ती शाखेचे उपाध्यक्ष नरेश गडेकर आणि नागपूर सांस्कृतिक संचनालयाचे सहसंचालक संदीप शेंडे उपस्थित होते.

वसंत खडसे, रुपेश गायधने,कुणाल गडेकर, मंजुश्री डोंगरे, दिलीप देवरनकर, मुकुंद वसुले, आणि झाडपट्टी रंगभूमीवरून शेखर डोंगरे, हिरालाल पेंटर, पूजा पिंपळकर, प्रल्हाद मेश्राम, नितीन नाकाडे, अनिल उत्तरवार, अमर मसराम आणि सहकारी उपस्थित होते.

## हिंद-दी-चादर प्रवेशद्वाराचे लोकार्पण : गुरु तेग बहादूरजींचे जीवन मानवतेचा आदर्श - आ. सुधीर मुनगंटीवार

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

तुकूम येथील श्री गुरुनानक दरबार गुरुद्वारासमोरील श्री गुरु तेग बहादूरजी हिंद-दी-चादर प्रवेशद्वार' उभारणीसाठी ४५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देत सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा गुरुद्वारा समितीच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. गुरु तेग बहादूरजींच्या प्रकाश उत्सवानिमित्त उभारण्यात आलेल्या या भव्य प्रवेशद्वाराच्या लोकार्पणानंतर झालेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी, हे प्रवेशद्वार केवळ वाहतुकीसाठी उभारलेली वास्तू नसून शौर्य, त्याग, मानवता,



सेवाभाव आणि धर्मरक्षणाचा संदेश देणारे प्रेरणास्थान असल्याचे प्रतिपादन केले.आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते २६ जानेवारी २०२४ रोजी या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन झाले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गुरुद्वारा श्री गुरुनानक दरबारसमोर ४५ लाख रुपयांच्या निधीतून हे भव्य प्रवेशद्वार साकार झाले असून त्यास श्री गुरु तेग बहादूरजी हिंद-दी-चादर प्रवेशद्वार असे नामकरण करण्यात आले आहे. ४ ऑगस्ट २०२६ रोजी गुरुद्वारा समितीच्या वतीने आयोजित समारंभात या प्रवेशद्वाराचे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमात अर्जुन सिंग धुन्ना आणि श्रीमती दशमीत वाधवा यांनी गुरु तेग बहादूरजींच्या जीवनावर आधारित सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक करताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, या सादरीकरणातून गुरु तेग बहादूरजींच्या त्याग, बलिदान आणि धर्मरक्षणाच्या कार्याची प्रभावी अनुभूती मिळाली. हिंद-दी-चादर ही उपाधी त्यांना का प्राप्त झाली, हे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले. त्यांनी दोन्ही कलाकारांचे विशेष अभिनंदनही केले.

या प्रवेशद्वारासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी अर्जुन सिंग धुन्ना व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली होती. त्याची दखल घेत तातडीने निधी मंजूर करण्यात आला, असे सांगताना आ. मुनगंटीवार यांनी हे प्रवेशद्वार समाजात शौर्य, करुणा, त्याग आणि सेवाभावाचा संदेश पोहोचवणारे स्मारक असल्याचे नमूद केले. शीख समाजाच्या परंपरेचा गौरव करताना त्यांनी सांगितले की, निःस्वार्थ सेवा, मानवता आणि लंगराच्या परंपरेतून संपूर्ण जगाला बंधुभावाचा संदेश देण्याचे कार्य शीख समाजाने केले आहे. भुकेल्याला अन्न देणे हीच खरी ईश्वरभक्ती असल्याची शिकवण समाजासाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

गुरु तेग बहादूरजींनी धर्मांतराचा पुरस्कार न करता प्रत्येकाने आपल्या धर्मात राहून श्रद्धा आणि मूल्यांचे रक्षण करावे, यासाठी स्वतःचे सर्वोच्च बलिदान दिले. त्यामुळे त्यांचे जीवन संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी असल्याचेही आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले.

यावेळी गुरुद्वारा समिती, शीख समाज आणि उपस्थित नागरिकांनी केलेल्या सन्मानाबद्दल आ. मुनगंटीवार यांनी खालसा हेल्प फाउंडेशनचे तेजेंदर सिंग दारी, अर्जुन सिंग धुन्ना, बलबीर सिंग गुरोन, चिंटू गढोंक, पुरण सिंग जुनेजा, सोनू अनेजा, राजू सचदेवा, नीतू बावरे तसेच श्री गुरुद्वारा गुरुनानक दरबार समितीचे आभार मानले. समारंभाला गुरुद्वारा समितीचे पदाधिकारी, शीख समाजातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुसद येथे महाराष्ट्र गवळी समाज संघटनेतर्फे गुणवंतांचा सत्कार




**दै. सिंहवाणी वृत्त, पुसद**

शेकडो समाजबांधवांच्या साक्षीने पुसद येथील जिजामाता मंगलम, कारला रोड येथे महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा युवा उद्योजक वैभव फुके यांच्या नेतृत्वाखाली दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य-दिव्य गुणगौरव व सत्कार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

समाजातील शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, शिक्षक-शिक्षिका, उद्योजक, पालक, विद्यार्थी व समाजबांधवांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजाचे भूषण, ज्येष्ठ नेतृत्व हंसराज अहिर, माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष, ओबीसी आयोग उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून इंद्रनीलभाऊ नाईक, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे लाडके खासदार संजय भाऊ देशमुख, निलय नाईक, माजी आमदार विधान परिषद, प्राध्यापक गोविंद फुके, कृषी शास्त्रज्ञ, अशोक मंडले, राजेश यमगवळी, प्रवीण हुंडीवाले, डॉ. नानाभाऊ फुके, दिलीपराव पारध, बबनराव पारध, जयाजीराव मंदाडे, शरद कुबडे, नारायण पुलाते, महेश अवथळे, हमीद भाई प्यारे वाले तसेच समाजातील

### हंसराज अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांचा गौरव

ज्येष्ठ नागरिक, महिला, सर्व शिक्षक-शिक्षिका, उद्योजक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद यांनी केले, तर विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन प्राध्यापक अनिल मंदाडे यांनी केले. त्यांच्यासमवेत प्राध्यापक सुरेंद्र बोरकुट, सुनील पुलाते, मनोज कुबडे आणि योगेश पुलाते यांनी विद्यार्थ्यांच्या सत्काराचे उत्कृष्ट नियोजन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हिरामण आप्पा गवळी, प्रदेश सचिव शरद कुबडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव पुलाते, डॉ. बोरकुट तसेच उद्योजक गजाननभाऊ मंडाडे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## भरधाव ट्रकची कारला धडक; उमरेड बायपास चौकातील घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

उमरेड शहरातील बायपास चौकात भरधाव व निष्काळजीपणे चालविलेल्या ट्रकने कारला धडक दिल्याची घटना ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडली. या अपघातात कारचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. याप्रकरणी अखिलेश गुलाबराव जुनघरे वय २९, रा. चिचघरे ले आउट, उमरेड यांनी दिलेल्या तक्रारीवरून उमरेड पोलीस ठाण्यात ट्रक चालक दुश्यंत शेषराव शिवरहुके वय ३०, रा. वलनी वस्ती, पो. खापरखेडा, जि. नागपूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आपल्या कारने क्र. MH-31-FX-5849 नागपूरकडे जात असताना उमरेड बायपास सिग्नलजवळ वाहन उभे होते. त्यावेळी मागून आलेल्या ट्रकने क्र. MH-40-CT-3528 भरधाव व निष्काळजीपणे धडक दिली. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले. मात्र, फिर्यादीला कोणतीही शारीरिक दुखापत झाली नाही. या प्रकरणी उमरेड पोलीस ठाण्यात विविध कलमा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भगवानदास यादव करीत आहेत.

## २० वर्षों से न्याय की लड़ाई लड़ रहे पूर्व रेलवे वाटरमैन ने राष्ट्रपति से लगाई गुहार, स्थायी नौकरी की मांग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

मध्य रेलवे, नागपुर मंडल में वर्ष १९८६ से १९९१ तक ग्रीष्मकालीन वाटरमैन के रूप में कार्यरत रहे मो. शरीफ शफीम हुसैन ने अपने लंबे समय से लंबित रोजगार संबंधी मामले में राष्ट्रपति से न्याय दिलाने की गुहार लगाई है। उनका कहना है कि वर्ष १९९२ से वे लगातार स्थायी नियुक्ति के लिए संघर्ष कर रहे हैं, लेकिन आज तक उन्हें न्याय नहीं मिल सका।

मो. शरीफ ने बताया कि वे २३२ एमआरसीएल वाटरमैन कर्मचारियों के समूह का हिस्सा थे। वर्ष १९९२ में सभी कर्मचारियों की सेवाएं समाप्त कर दी गई थीं। इसके बाद उन्होंने शांतिपूर्ण आंदोलन, सत्याग्रह, रेल महाप्रबंधक मुंबई, मंडल रेल प्रबंधक नागपुर तथा तत्कालीन रेल मंत्री स्व. रामविलास पासवान सहित अनेक जनप्रतिनिधियों से मुलाकात कर स्थायी नियुक्ति की मांग की। वर्ष १९९७ में आंदोलन के दौरान उन्होंने आत्मदाह का प्रयास किया, जिसमें उनका दाहिना पैर लगभग ३० प्रतिशत झुलस गया। उन्होंने बताया कि रेलवे बोर्ड द्वारा वर्ष १९९६ के रजिस्टर में दर्ज हजारों कर्मचारियों को नियमित करने के आदेश जारी किए गए थे। उनके अनुसार २३२ कर्मचारियों में से कई लोगों को ग्रुप-डी के गैंगमैन एवं सफाई कर्मचारी के पद पर नियुक्ति मिली, जबकि उन्हें कथित रूप से आंदोलन में सक्रिय रहने के कारण नियुक्ति से वंचित रखा गया।

मो. शरीफ ने बताया कि उन्होंने लेबर कोर्ट, सीजीआईटी, हाईकोर्ट और अंततः सुप्रीम कोर्ट तक न्याय के लिए संघर्ष किया। हाल ही में सुप्रीम कोर्ट ने विलंब के आधार पर उनकी याचिका खारिज कर दी। उनका कहना है कि उन्हें १.४५ लाख रुपये का मुआवजा देने की बात कही गई, लेकिन वे मुआवजे के बजाय रेलवे में ग्रुप-डी के गैंगमैन अथवा सफाई कर्मचारी के पद पर नियुक्ति चाहते हैं।

उन्होंने महाराष्ट्र के मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, राजस्व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तथा अन्य जनप्रतिनिधियों से हस्तक्षेप की अपील की है। उनका कहना है कि उनकी दो पत्नियां, सात बच्चे हैं और केवल मुआवजे की राशि से परिवार का पालन-पोषण, बच्चों की शिक्षा और घर का खर्च चलाना संभव नहीं है।



उन्होंने राष्ट्रपति से मिलने का अवसर प्रदान कर न्याय दिलाने की मांग करते हुए कहा है कि यदि शीघ्र उनकी मांगों पर उचित निर्णय नहीं लिया गया तो वे निराशा में कठोर कदम उठाने को मजबूर होंगे। उन्होंने सरकार और रेलवे प्रशासन से मानवीय आधार पर उनके मामले में तत्काल हस्तक्षेप करने की अपील की है।

थोडक्यात

## भंडारा शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे काँग्रेसद्वारा केलेल्या वक्तव्याचा निषेध



**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

काल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या अधिकृत अकाउंट वरून राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्याचा शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर निषेध नोंदविला गेला. आज गांधी चौक भंडारा येथे महात्मा गांधी यांच्या प्रतिमेसमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खासदार प्रफुलभाई पटेल व खासदार राजेंद्र जैन यांच्या निर्देशानुसार जिल्हाध्यक्ष नाना पंचबुद्धे व प्रदेश महासचिव धनंजय दलाल यांच्या नेतृत्वात काँग्रेस पक्षाच्या वतीने केलेल्या वक्तव्याचा जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले.

पुरोगामी महाराष्ट्रात महिलांचा अवमान कधीही स्वीकारला जाणार नाही. हा केवळ आदरणीय सुनेत्राताईंचा नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक महिलेचा अपमान आहे. त्यामुळे काँग्रेसच्या वतीने करण्यात आलेल्या आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्याचा तीव्र निषेध करून महाराष्ट्रातील सर्व महिलांची सार्वजनिक माफी काँग्रेस पक्षाने मागावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महिला जिल्हाध्यक्ष सरिताताई मदनकर, डॉ. रवींद्र वानखेडे, डॉ.श्रीकांत वैरागडे, डॉ. जगदीश निंबार्ते, हेमंत महाकाळकर, नरेंद्र झंझाड, प्रशांत देशकर, राजू सलाम पटेल, शेखर (बाळाभाऊ ) गभने, मनीष वासनिक, सुनील साखरकर, राजेश वासनिक, कीर्ती गणवीर, मंजुषा बुरडे, महेंद्र वाहने, सोहेल अहमद, गणेश चौधरी, अमन मेश्राम, विक्रम उजवणे, विजय खेडेकर, भानुदास बनकर, खुशाल निपाने, महेश जगनाडे, पंकज काळे, फरहान पटेल, धनंजय ढगे, थामदेव निमजे, धनवंता बोरकर व मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## आयटीआयमध्ये संस्थास्तरीय समुपदेशन, प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रद्धानंद पेठ, नागपूर येथे संस्था स्तरीय समुपदेशन प्रवेश फेरी - २०२६ अंतर्गत प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. नव्याने ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे तसेच अर्ज निश्चिती करण्याची प्रक्रिया दि. ७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. संस्था स्तरीय समुपदेशनासाठी इच्छुक उमेदवारांनी दि. ९ व १० ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत लॉगिन करून प्रवेशासाठी नोंदणी करणे तसेच संस्थेमध्ये प्रत्यक्ष हजेरी लावणे आवश्यक आहे. दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानिहाय गुणवत्ता यादी व समुपदेशनाचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यानंतर दि. १२ व १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत स्पॉट अूडमिशन अंतर्गत संस्थेमध्ये प्रत्यक्ष समुपदेशन व प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल. उपलब्ध जागा, गुणवत्ता क्रमांक व पात्रतेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश वाटप करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांनी त्याच दिवशी आपला प्रवेश निश्चित करणे आवश्यक राहील. दुसरी संस्था स्तरीय समुपदेशन फेरी दि. १७ ते २२ ऑगस्ट २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

या कालावधीत दररोज सकाळी ८.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत उमेदवारांनी हजेरी नोंदवावी. त्यानंतर दुपारी १.०० वाजता गुणवत्ता क्रमांकानुसार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच दुपारी १.०० वाजल्यापासून अंतिम उमेदवारापर्यंत समुपदेशन व प्रवेश प्रक्रिया सुरू राहील. ज्या व्यवसायांमध्ये जागा शिल्लक राहतील, त्या जागांसाठी समुपदेशन प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्यात येईल. प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रांसह वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या उपसंचालक श्वेता कुलकर्णी यांनी केले आहे. ही माहिती संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख सहदेव चव्हाण यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

## मिलिंद देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त काटोल येथे रोजगार मेळावा व मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन शुक्रवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

शिवसेना (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख तथा जागता राजा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद (पिंटू) देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त



शुक्रवारी ७ ऑगस्ट रोजी काटोल येथे भव्य रोजगार मेळावा तसेच मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम सकाळी १० वाजता लक्ष्मीकमल भवन, पंचवटी, काटोल येथे पार पडणार असून, रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक- युवतींसाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, पदव्युत्तर, अभियंता तसेच फ्रेशर्स व अनुभवी उमेदवारांसाठी विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांमध्ये थेट मुलाखतीची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रोजगार मेळाव्यात मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, आयटी व बीपीओ, बँकिंग व फायनान्स, हॉस्पिटॅलिटी, हेल्थकेअर, रिटेल, लॉजिस्टिक्स, वेअरहाऊस, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, डिजिटल सेवा आदी विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांचा सहभाग राहणार आहे. महाराष्ट्रातील अनेक आघाडीच्या कंपन्यांकडून उमेदवारांची थेट मुलाखत घेण्यात येणार असून, पात्र उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. यासोबतच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी, सल्ला व आवश्यक मार्गदर्शन दिले जाणार आहे. नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेऊन आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या रोजगार मेळाव्यासाठी इच्छुक उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, बायोडाटा व ओळखपत्रासह उपस्थित राहावे, तसेच अधिकाधिक युवक- युवती व नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मिलिंद (पिंटू) देशमुख मित्र परिवार व जानता राजा प्रतिष्ठान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नागपूरच्या क्रीडा व पर्यावरण विकासासाठी मनपाची मोठी झेप

### महापौरांचा ऑलिम्पिक दर्जाच्या सुविधा उभारण्यावर भर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नागपूर महानगरपालिकेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शहरातील ७५ मैदाने व ७५ उद्यानांचा सर्वांगीण विकास करण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती देण्यात आली असून, प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील मैदाने व उद्याने विशिष्ट संकल्पनेवर (थीम) आधारित विकसित करण्यात येणार आहेत. या प्रकल्पासंदर्भात विविध संस्थांनी सादर केलेल्या आराखड्यांचा आढावा घेण्यासाठी बुधवारी (ता. ५) मनपा मुख्यालयातील स्मार्ट सिटी सभागृहात महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

बैठकीत उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते तथा मैदान व उद्यान प्रकल्प विशेष समिती अध्यक्ष नरेंद्र (बाल्या) बोरकर, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, क्रीडा विशेष समितीच्या सभापती दर्शनी धवड, उपायुक्त गणेश राठोड, उपायुक्त मंगेश खवले, वृक्ष संवर्धक समितीचे अमोल चौरपगार, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि मनपाचे अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून शहराचा पायाभूत विकास, सौंदर्यीकरण तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी अत्याधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे बोरकर यांनी सांगितले.

बैठकीत दाभा मैदान, कान्हेरे मैदान, पांडे ले-आऊट मैदान, दिघोरी मैदान, रमाबाई उद्यान, भारत माता उद्यान, खोंडे उद्यान, निर्मल नगरी उद्यान आदी मैदाने व उद्यानांच्या विकास आराखड्यांचे सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणानंतर महापौर निता ठाकरे यांनी मैदाने ऑलिम्पिक दर्जाच्या निकषांनुसार विकसित करण्यावर भर द्यावा, जेणेकरून स्थानिक खेळाडूंना उच्च दर्जाच्या सुविधा मिळतील, अशा सूचना दिल्या. उद्याने व मैदाने विकसित करताना त्यांच्या देखभाल व व्यवस्थापनासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे, सर्व ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्याचे, तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. प्रत्येक उद्यानात रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली आणि स्वच्छतागृहाची सुविधा अनिवार्यपणे उपलब्ध करून देण्याचे सक्त निर्देशही महापौर निता ठाकरे यांनी यावेळी दिले.

मनपाच्या ठरावानुसार शहरातील उद्याने व मैदाने विकसित करण्यासाठी सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली नगरसेवक व अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.

यावेळी बोरकर यांनी प्रत्येक उद्यान स्वतंत्र संकल्पनेवर (थीम) विकसित करण्याबरोबरच उद्यानांमध्ये पर्यावरण संवर्धन करून भरपूर हिरवळ, आकर्षक प्रवेशद्वार, उत्कृष्ट लँडस्केपिंग आणि नागरिकांच्या अपेक्षांनुसार थीम निश्चित करण्याच्या सूचना दिल्या. संबंधित भागातील नगरसेवक आणि नागरिकांच्या सूचनांचा विचार करूनच अंतिम आराखडा तयार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी भविष्यात राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करता येईल, या दृष्टीने क्रीडा मैदाने मोठ्या आकाराची व सर्व सुविधांनी सुसज्ज विकसित करण्याचे निर्देश दिले. शहरातील क्रीडा संस्कृतीला चालना देतानाच नागरिकांना दर्जेदार उद्याने व विरंगुळ्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

सादरीकरणामध्ये स्विमिंग पूल, बास्केटबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, कबड्डी मैदान, मल्लखांब, व्हॉलीबॉल कोर्ट, मुलांसाठी खेळ क्षेत्र, जॉगिंग ट्रॅक, फाउंटन, रॉक क्लायम्बिंग, ॲम्पीथिएटर, ग्लो गार्डन, रॉक गार्डन, बॉटनिकल उद्यान, जिम हॉल, झुंबा हॉल आदी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे मैदानांचा व उद्यानांचा समावेश करण्यात आला होता. या सुविधांमध्ये आवश्यक बदल करून नागरिकांसाठी अधिक उपयुक्त घटकांचा समावेश करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. महाल भागात मध्य भारतातील पहिले ओलंम्पिक निकषांचा स्वामिंग पूल तयार करण्यात येणार असून तेथे जिम्नॅशियम देखील प्रस्तावित आहे.

# राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत कर्मचारी प्रश्नांवर सखोल मंथन

### दिल्लीतील ऐतिहासिक महारॅलीसाठी महाराष्ट्रातून ३ हजार प्रतिनिधींचे लक्ष्य, जिल्हानिहाय नियोजनाचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेड**



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या राज्य कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक नांदेड जिल्हा परिषद येथील कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रशांत जामोदे यांची प्रमुख उपस्थिती लाभलेल्या या बैठकीत कर्मचारी हिताशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न, संघटनात्मक बळकटीकरण आणि आगामी राष्ट्रीय आंदोलनाच्या तयारीवर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीचे आयोजन नांदेड जिल्हा महासंघाच्या वतीने करण्यात आले होते. प्रारंभी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राज्य कार्याध्यक्ष तथा केंद्रीय उपाध्यक्ष प्रशांत जामोदे, राज्य सरचिटणीस संजय महाळणकर, राज्य उपाध्यक्ष कैलासनाना वाघचौरे, सल्लागार अतुल वर्मा, महिला उपाध्यक्ष कविता बोंद्रे यांच्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मागील सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली. कर्मचारी हिताच्या विविध प्रलंबित सेवा विषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करत राज्य शासनाकडे पाठपुरावा अधिक प्रभावी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. राज्य महासंघ तसेच अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाने केलेल्या संघटनात्मक व कर्मचारीहिताच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. वार्षिक वर्गणी, जिल्हा महासंघ व प्रभाग संघटनांच्या कामकाजाचे परीक्षण करण्यात आले.

प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी आपल्या संघटनात्मक कार्याचा अहवाल सादर करत सदस्य नोंदणी, संघटन विस्तार आणि कर्मचारी प्रश्नांवर एकसंघ लढा उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी दिल्ली (फरीदाबाद) येथील महासंघाच्या मुख्यालयात सांस्कृतिक व शिक्षण-प्रशिक्षण समितीचे केंद्रीय अध्यक्ष म्हणून स्वतंत्र जबाबदारी मिळाल्याबद्दल राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच केंद्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रशांत जामोदे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल संजय महाळणकर तसेच अन्य पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

बैठकीच्या समारोपप्रसंगी राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांनी १२ डिसेंबर २०२६ रोजी नवी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर आयोजित भव्य महारॅलीसाठी महाराष्ट्रातून किमान तीन हजार प्रतिनिधी सहभागी करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले असून, प्रत्येक जिल्ह्याने आतापासूनच सूक्ष्म नियोजन करून संघटनात्मक तयारीला सुरुवात करावी, असे आवाहन केले. ही महारॅली कर्मचारी हक्क आणि प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी देशव्यापी शक्तिप्रदर्शन ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला."कर्मचारी एकता झिंदाबाद", "महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचा विजय असो" अशा घोषणांनी सभागृह दुमदुमून गेले. गजानन शिंदे यांनी आभार मानले. बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा महासंघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भिवापूरच्या आठवडी बाजारात 'पठाणी' वसुली?

### ठरलेल्या दरांपेक्षा अधिक आकारणीचा आरोप, कारवाईची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

नगरपंचायतीने आठवडी बाजारातील बाजार ड्युटी (बाजार कर) वसुलीसाठी जागेच्या क्षेत्रफळानुसार स्पष्ट दर निश्चित केले असतानाही प्रत्यक्षात व्यापारी आणि शेतकऱ्यांकडून त्यापेक्षा जादा रक्कम उकळली जात असल्याच्या तक्रारींनी संताप व्यक्त केला जात आहे. या कथित 'पठाणी वसुली'ला तात्काळ लगाम घालून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पुढे आली आहे.

नगरपंचायतीच्या ठरावानुसार २४ जुलै २०२६ पासून बाजार ड्युटीचे दर लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार जागेच्या क्षेत्रफळावर आधारित शुल्क २० रुपयांपासून २५० रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आले असून, धान्य, कांदा, भाजीपाला, कॅरेट व टोपल्यांसाठीही स्वतंत्र शुल्क निश्चित आहे. तसेच शेतकरी बाजारात माल घेऊन आल्यास त्यांच्या जागेवरून बाजार ड्युटी आकारता येणार नाही, अशी स्पष्ट अटही घालण्यात आली आहे.

मात्र, या सर्व नियमांना हरताळ फासून काही व्यापारी व शेतकऱ्यांकडून ठरलेल्या दरांपेक्षा अधिक रक्कम वसूल केली जात असल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. नगरपंचायतीने ठळक ठिकाणी बाजार ड्युटीचे दरफलक लावण्याची अट घातली असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप होत आहे.

बाजारातील छोट्या विक्रेत्यांच्या खिशावर डल्ला मारणारी ही कथित जादा वसुली तात्काळ बंद करून ठेकेदाराची चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास ठेका रद्द करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी व्यापारी व शेतकरी वर्गातून होत आहे. आता नगरपंचायत प्रशासन या तक्रारींची दखल घेऊन कारवाई करते की ठेकेदाराला अभय देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या बेला शाखेची नवीन कार्यकारिणी जाहीर

### नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक उत्साहात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, बेला-अखिल रोडे**

व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या बेला शाखेची प्रथम बैठक रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी बेला येथील रवी पराते यांच्या रेस्टॉरंटमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी नागपूर जिल्हाध्यक्ष दिलीप घोरमारे होते.

बैठकीत संघटनेच्या विस्तारासाठी आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, संघटन अधिक मजबूत करणे, नवीन सदस्य नोंदणी, सामाजिक बांधिलकीचे उपक्रम आणि पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर उपस्थितांनी सकारात्मक विचारमंथन केले.

यानंतर बेला शाखेच्या नवीन कार्यकारिणीची सवार्नुमते निवड करण्यात आली. त्यानुसार पुंडलिक कामडी यांची अध्यक्ष, खुशाल वैद्य व कैलास साठवने यांची उपाध्यक्ष, उत्तम पराते यांची सचिव, चंद्रशेखर भेंडे यांची सहसचिव, संदीप धदरे यांची कोषाध्यक्ष, अमित नवनागे यांची प्रसिद्धी प्रमुख आणि रवी पराते यांची जिल्हा प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. तसेच अखिल रोडे (लेखक, जनरालिस्ट), दिलीप मातनकर आणि रोशन मेहरकुरे यांची सभासद म्हणून निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कायार्साठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नागपूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष विनायक इगळे, राजू कापसे, निलम चकोले यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार सर्व उपस्थितांनी व्यक्त केला.

# अवैध धंद्यांवर धडक कारवाई करणाऱ्या ठाणेदाराची तडकाफडकी बदली

### जलालखेड्यात चर्चेला उधाण, एका महिन्यातच बदल्यामुळे नागरिकांमध्ये आश्चर्य, पालकमंत्र्यांकडे निवेदन देण्याची तयारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

जलालखेडा पोलिस ठाण्याचे ठाणेदार पवन बांभुरकर यांची मंगळवारी रात्री अचानक नागपूर शहर वाहतूक विभागात बदली करण्यात आल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. अवघ्या एका महिन्यापूर्वीच त्यांनी जलालखेडा पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारला होता. पदभार स्वीकारताच त्यांनी अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम उघडत सट्टा, जुगार, अवैध दारू विक्री, अवैध रेती वाहतूक आदी प्रकारांवर सलग कारवाया केल्याने त्यांची कामकाजाची पद्धत नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरली होती.



यापूर्वी पवन बांभुरकर हे नरखेड येथे उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. जलालखेडा येथे रुजू झाल्यानंतर त्यांनी गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविली. अनेक ठिकाणी छापे टाकून अवैध धंदे करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. त्यामुळे परिसरात कायद्याचा धाक निर्माण झाल्याचे नागरिकांकडून बोलले जात होते.

मात्र, अशा कारवायांनंतर अवघ्या एका महिन्यातच त्यांची अचानक बदली झाल्याने सर्वसामान्य नागरिकांसह सामाजिक क्षेत्रात आश्चर्य व्यक्त होत आहे. या निर्णयामागील कारणांबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू असून, काहीजण यामागे तक्रारीचे कारण असल्याचा दावा करत आहेत. मात्र यासंदर्भात अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

जलालखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अनेक गावांतील नागरिक व सामाजिक कार्यकर्ते पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन या प्रकरणी निवेदन देण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रभावी काम करणाऱ्या अधिकाऱ्याची अचानक बदली झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

स्थानिकांच्या मते, अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या कारवायांचा वेग कायम राहणे आवश्यक असून, नव्याने येणाऱ्या अधिकाऱ्यानेही त्याच कठोर भूमिकेतून कारवाई सुरू ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> "अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेणाऱ्या अधिकाऱ्याची अचानक बदली होणे दुर्दैवी आहे. या संदर्भात वरिष्ठ स्तरावर सविस्तर चर्चा झाली असून सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे."
>
> **– दिनेश टुले, माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते, भिष्णुर**

# राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध सपकाळ

## नागपूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आक्रमक निषेध आंदोलन, पोलिसांकडून कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न, गांधीजींच्या तीन माकडांच्या प्रतिकृतीवर हर्षवर्धन सपकाळ यांचा चेहरा लावून अनोख्या पद्धतीने निषेध, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह विधानाविरोधात सर्वत्र संतापाची लाट




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, सुनेत्रा पवार यांच्याबद्दल केलेल्या अत्यंत आक्षेपार्ह आणि अपमानास्पद विधानाच्या निषेधार्थ आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नागपूर शहरच्यावतीने व्हेरायटी चौक, सिताबर्डी येथे अत्यंत आक्रमक निषेध आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनात, शहराध्यक्ष अनिल अहिरकर यांच्या नेतृत्वात आणि शहराचे कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांच्या आयोजनात पार पडले. आंदोलनादरम्यान एका अत्यंत अनोख्या व आक्रमक पद्धतीने निषेध नोंदवण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 'तीन माकडां'च्या प्रतिकृतीवर 'बुरा मत बोलो' (वाईट बोलू नका) असा संदेश देत त्यावर काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांचा चेहरा लावण्यात आला होता. आंदोलकांनी संपूर्ण परिसर "हर्षवर्धन सपकाळ मुर्दाबाद" आणि "महिलांचा अपमान सहन करणार नाही" अशा तीव्र घोषणांनी लावून धरला होता.

या आंदोलनात अनिल अहिरकर, राजाभाऊ टाकसाळे, श्रीकांत शिवणकर, प्रशांत पवार, आभाताई पांडे, बजरंग सिंग परिहार, तानाजी वनवे, राजेश माटे, दिलीप पनकुले, रमेश फुले, जानबा मस्के, सुनीता येरणे, विशाल खांडेकर, माधुरी पालीवाल, नूतन रेवतकर, मनोज सांगोळे, ब्रह्मानंद मस्के, राजेश शुक्ला, दिनेश रोडगे, मुकेश रेवतकर, संदीप सावरकर, खिजर अली, राजू मिश्रा, मोंटी गंडेचा, राजेश समर्थ, नितीन डेंगे, राजेश फुले, राजू नागुलवार, बंटी मुल्ला, श्वेता डोमकुंडवार, राहुल कांबळे, डॉ. मेंढ, विश्वास पक्किडे, जगदीश पंचबुदे, मनीषा शाहू, बिरू सिंग, भूषण हरडे, मुमताज बाजी, शहाजा बाजी, कनिजा बेगम, गोविंदराव सोमकुवर, योगेश चीवांडे, मनीष मसराम, अमरपाल सिंग राजपूत, यशस्वी बनसोड, अंजुम शेख, निसार अली, सत्यम सोडगीर, विवेक वानखेडे, भोला पटेल, कुलवंतसिंग भामरा, रूपाली पिचकाटे, प्रवीण पाटील, अमित पिचकाटे, सुनील विभुते, श्याम बिहारी पांडे, कपिल नारनवरे, तुषार ढबाले, विश्वास सेलसूरकर, राहुल आमदरे, मिलिंद जगताप, रमेश कांबळे, नामदेव देशकर, कमलेश कोटावर, दुर्वेश खडसे यांसह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवक काँग्रेस विरुद्ध शाह

## नागपुरातील व्हेरायटी चौकात युवक काँग्रेसचे 'अमित शाह जवाब दो' बॅनर झळकले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दिल्ली येथे २० जुलै रोजी विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ नागपूर शहर युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व्हेरायटी चौक येथील गांधी पुतळा परिसरातील उड्डाणपुलावर अनोखे आंदोलन केले.

आंदोलनादरम्यान 'अमित शाह जवाब दो' असे शीर्षक असलेले मोठे बॅनर उड्डाणपुलावरून झळकविण्यात आले. बॅनरवरील 'मोदी ने मरवा दिया' आणि जेन झी से डर गया बूमर मोदी' या घोषणांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.




युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हातात पक्षाचे झेंडे घेऊन केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कारवाईस जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित करत आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारकडून स्पष्टीकरणाची मागणी केली. या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनात युवक काँग्रेसचे प्रदेश महासचिव अक्षय हेटे, रौनक चौधरी, सुशांत लोखंडे, रजा अली, समीर तिमांडे, साहिल मोहोड, राहुल खैरकर, आयुष गोरले, शिवम चौधरी, आदित्य शिंगाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# युवा शक्तीच्या बळावर प्रत्येक बूथ मजबूत होईल, जनतेपर्यंत सरकारच्या योजना पोहोचतील : रोहित अग्रवाल

## भाजयुमोच्या विस्तारित बैठकीत संघटन विस्तार आणि बूथ सशक्तीकरणावर भर



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**
भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) गोंदिया जिल्ह्याची विस्तारित बैठक बुधवारी शहरातील अग्रसेन भवन हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत संघटना बूथ स्तरापर्यंत अधिक बळकट करणे, पक्षविस्तार मोहिमेला गती देणे, केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे तसेच आगामी निवडणुकांच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस भाजप जिल्हाध्यक्ष सीताताई रहांगडाले, भाजयुमो जिल्हाध्यक्ष रोहित अग्रवाल, महामंत्री पंकज रहांगडाले, नरेंद्र वाजपेयी, हर्षकुमार मोदी, आशीष बारेवार आदी उपस्थित होते.

बैठकीत पक्षाची संघटनात्मक बळकटी, सक्रिय कार्यकर्त्यांची निर्मिती, युवा नेतृत्वाला संधी देणे आणि प्रत्येक बूथवर मजबूत संघटनात्मक रचना उभी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या विकासकामांचा, आत्मनिर्भर भारत, डिजिटल इंडिया, विकसित भारत-२०४७ या संकल्पाचा आणि जनहिताच्या विविध योजनांचा प्रसार सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे करण्याचे आवाहन करण्यात आले. राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा व्यापक प्रचार-प्रसार करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्यांचा लाभ पोहोचविण्यावरही विशेष भर देण्यात आला.

या वेळी भाजयुमो गोंदिया जिल्हाध्यक्ष रोहित अग्रवाल यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना सांगितले की, युवा मोर्चा ही भारतीय जनता पक्षाची सर्वात ऊर्जावान आणि गतिमान शक्ती आहे. आगामी निवडणुकांमध्ये प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ स्तरावर सक्रिय राहून संघटना मजबूत केली पाहिजे. पक्षाचे ध्येय केवळ निवडणूक जिंकणे नसून राष्ट्रहित, सेवा, सुशासन आणि विकासाची विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आहे, असेही ते म्हणाले. सोशल मीडिया, जनसंपर्क, सेवा उपक्रम आणि संघटनात्मक कार्यक्रमांत सक्रिय सहभाग घ्या, तसेच प्रत्येक कार्यकर्त्याने आपला बूथ पक्षाचा सर्वात मजबूत बूथ करण्याचा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीत बोलताना भाजप गोंदिया जिल्हाध्यक्ष सीताताई रहांगडाले म्हणाल्या की, भारतीय जनता पक्ष हा आज जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी संघटन आहे, ज्याची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याचे समर्पित कार्यकर्ते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकास, सुशासन आणि आत्मनिर्भरतेच्या नव्या उंची गाठत आहे. राज्य सरकारही जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देत विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत आहे. कार्यकर्त्यांनी सरकारच्या उपलब्धी आणि योजनांची माहिती घराघरात पोहोचवून सामान्य जनतेला त्यांच्याशी जोडावे, तसेच संघटनेची नीती आणि राष्ट्रवादी विचारधारा समाजात अधिक बळकट करावी, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत आगामी संघटनात्मक कार्यक्रम, सदस्यत्व विस्तार, सेवा उपक्रम, युवा संमेलन, बूथ व्यवस्थापन, मतदार संपर्क अभियान आणि निवडणूक तयारी यावरही सविस्तर चर्चा झाली. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संघटनहितासाठी पूर्ण समर्पणाने कार्य करण्याचा आणि प्रत्येक बूथ सशक्त करून पक्ष अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रसंगी युवा मोर्चाच्या मंडळ व जिल्हा पदाधिकाऱ्यांना नवीन जबाबदारीसह पक्षाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

बैठक यशस्वी करण्यासाठी मनोज बोपचे, पुष्पराज जनबंधु, अभय मानकर, इंद्रजीत भाटिया, संतोष कटरे, विक्की बघेले, कमलेश चुटे यांच्यासह सर्व मंडल अध्यक्ष, युवा मोर्चा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.

# मौदा तालुका संजय गांधी निराधार योजना समिती सभेत जवळपास ३०० प्रलंबित प्रकरणांचा निपटारा

## सदस्य विशाल सेलोकर यांच्या सक्रिय पाठपुराव्यामुळे समितीचे काम अधिक गतिमान



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
मौदा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना समिती गठित झाल्यापासून अध्यक्ष रामेश्वर लिचडे व नायब तहसीलदार अनिल भगत यांच्या सक्षम नेतृत्वाखाली समितीने उल्लेखनीय कार्य करत प्रलंबित प्रकरणांचा यशस्वी निपटारा केला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या दिव्यांग, विधवा आणि श्रावणबाळ योजनेतील प्रकरणांना प्राधान्य देत पात्र लाभार्थ्यांना वेळेत न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम समिती करत आहे.

समितीने आपल्या कार्यपद्धतीत गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रणाली विकसित केली असून, अर्जांची जलद छाननी, त्वरित निर्णयप्रक्रिया, योजनांची व्यापक प्रसिद्धी आणि लाभार्थ्यांना वेळेत मदत मिळावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे मौदा तालुक्यात संजय गांधी निराधार योजना समितीच्या कार्याची सकारात्मक दखल घेतली जात आहे.

समितीचे सदस्य विशाल सेलोकर यांनी शासनाच्या नव्या सूचना व नियमांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, योजनांचा प्रभावी प्रचार-प्रसार करणे, अर्जांचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ वेळेत मिळवून देण्यासाठी विशेष योगदान दिले आहे. त्यांच्या पुढाकारामुळे समितीचे काम अधिक वेगवान, सुटसुटीत आणि परिणामकारक झाले आहे.

नुकत्याच झालेल्या समितीच्या बैठकीतही जवळपास ३०० प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला असून, लाभार्थ्यांच्या अडचणी तातडीने सोडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. शासनाच्या प्रत्येक कल्याणकारी योजनेचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचावा, यासाठी समिती भविष्यातही अधिक जोमाने कार्यरत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी समितीचे अध्यक्ष रामेश्वर लिचडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजहिताच्या कार्याला निरंतर यश लाभावे, अशा मनःपूर्वक शुभेच्छा समितीच्या सर्व सदस्यांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष रामेश्वर लिचडे, सचिव नायब तहसीलदार अनिल भगत, सदस्यगण तालुका शिवसेनाप्रमुख (रामटेक विधानसभाक्षेत्र) प्रशांत भुरे, तालुका शिवसेना प्रमुख (कामठी विधानसभाक्षेत्र) नितेश वांगे, ग्रा पं बोरी (घिवारी )सरपंच विशाल सेलोकर, ग्रा पं बेरडेपार सरपंच रेवा देशमुख, ग्रामपंचायत तारसा सरपंचा वैशाली आनंद लेंडे सह इतर सदस्यगणही उपस्थित होते.

# गेल्या वर्षभरापासून १७० कुटुंबांचा रस्त्याच्या कडेला निवारा; तातडीने पुनर्वसन करण्याची आमदार विकास ठाकरे यांची मागणी

## पुनर्वसन न करताच दोन झोपडपट्ट्या जमीनदोस्त, गरीब नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघातील राजनगर आणि संत ज्ञानेश्वर नगर परिसरात मागील ४० ते ५० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या १७० हून अधिक कुटुंबांची घरे कोणतेही पुनर्वसन न करता पाडण्यात आली. मागील वर्षभरापासून ही कुटुंबे छताविना रस्त्यांच्या आणि नाल्यांच्या कडेला राहत आहेत. पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन या गरीब कुटुंबांचे तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी केली.





यासंदर्भात नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ठाकरे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले होते. बावनकुळे यांनी या झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. त्या अनुषंगाने ठाकरे यांनी झोपडपट्टीवासीयांसह जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि म्हाडाने विकसित केलेल्या घरकुल योजनांमध्ये या कुटुंबांचे तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी केली.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ मधील जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार आणि अनुच्छेद १९(१)(ई) मधून निवारा व वास्तव्याचा मूलभूत अधिकार प्राप्त होतो, असे ठाकरे यांनी निवेदनात नमूद केले. कोणत्याही नागरिकाचे, विशेषतः झोपडपट्टीवासीयाचे, पूर्वपुनर्वसन न करता घर पाडता येत नाही.

मानकापूर येथील संत ज्ञानेश्वर नगरमध्ये सुमारे ८५ कुटुंबे मागील ५० वर्षांपासून वास्तव्यास होती. त्याचप्रमाणे राजनगरमध्ये सुमारे ८२ कुटुंबे मागील ४० वर्षांपासून राहत होती. संत ज्ञानेश्वर नगरमधील घरे रेल्वेच्या कामासाठी, तर राजनगरमधील घरे अग्निशमन महाविद्यालयासाठी पूर्वपुनर्वसन न करताच पाडण्यात आली. त्यामुळे भारतीय संविधानातील तरतुदींचे उल्लंघन झाले असून ही कारवाई प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांच्याही विरोधात आहे, असे ठाकरे म्हणाले.

पश्चिम नागपूरमधील झिंगाबाई टाकळी येथील आदर्श नगर आणि ताजनगर या आणखी दोन झोपडपट्ट्यांमधील घरेही अशाच प्रकारे पाडण्यात आली. त्यामुळे या सर्व झोपडपट्टीवासीयांचे तातडीने पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी आमदार विकास ठाकरे यांनी केली.

# माजी विद्यार्थिनीच्या पुढाकारातून तोंडली शाळेतील विद्यार्थ्यांना पाटी व लेखणीचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी :** "जुनं ते सोनं" या संकल्पनेला उजाळा देत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडली येथील माजी विद्यार्थिनी कु. अर्चना धोतरे यांनी सोमवार (ता. ३ ऑगस्ट) ला शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला पाटी व लेखणी भेट देऊन शिक्षणासाठी मोलाचे योगदान दिले.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या हातात पुन्हा एकदा पाटी आली असून हस्ताक्षर सुधारणा, लेखनकौशल्य विकास तसेच अध्ययन अधिक प्रभावी व आनंददायी होण्यास मदत होणार आहे. माजी विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या अशा शैक्षणिक साहित्यामुळे शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये भर पडत असून विविध शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसही मोठी चालना मिळत आहे. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे तसेच सहाय्यक शिक्षक निलेश जाधव यांनी कु. अर्चना धोतरे यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. आपल्या मातृशाळेप्रती असलेली कृतज्ञता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम यामुळे हा उपक्रम इतर माजी विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अनिता धोतरे व लक्ष्मी धोतरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व उपस्थितांनी माजी विद्यार्थिनीच्या या स्तुत्य उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : गुरूवार, ६ ऑगस्ट २०२६

# राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी मतदार पडताळणीसाठी बीएलओंना सहकार्य करावे !

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आवाहन, जिल्हा प्रशासनातर्फे मतदाराच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी शर्तीचे प्रयत्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत नागपूर जिल्ह्यातील सर्व मतदारांचे फार्म भरुन घेण्यासाठी प्रशासन पूर्ण शतीर्ने प्रयत्न करीत आहे. यासाठी सर्व पक्षांच्या प्रतिनिधीसमवेत योग्य तो समन्वय ठेवून आपण याला गती देत आहोत. अनेक मतदारांनी आपले फार्म भरतांना अर्धवट पत्ते दिल्यामुळे अडचणी निदर्शनास येत आहेत. यावर मार्ग काढण्याच्या दृष्टीने स्थानिक नगरसेवकांनी व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी



बीएलओंना सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्ह्यातील विशेष सखोल पुनरिक्षण कामाला गती देण्यासाठी येथील देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सर्व राजकीय पक्षांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस १११ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, २०८ बीएलओ पर्यवेक्षक व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदारांचे फार्म भरुन घेतांना स्थानांतरण, दुबार, मय्यत अशी संख्या निदर्शनास येत आहे. याची खातरजमा ही प्रत्येक गृहभेटीतूनच होऊ शकते. कोणत्याही परिस्थितीत बीएलओंकडून त्यांना दिलेल्या भागातील एकही घर भेटीविना सुटता कामा नये असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना दिले. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांनी बीएलएची नियुक्ती करुन सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कोणताही पात्र मतदार यादीतून वगळला जाणार नाही व एकही मतदार वंचीत राहू नये यासाठी सर्वांची जबाबदारी निश्चित आहे. जिल्हा प्रशासनाने एसआयआरसाठी आजवर वेळोवेळी विविध राजकीय पक्षांच्या बैठका विविध स्तरांवर वारंवार घेतल्या आहेत. सद्यस्थितीत शहरातील संगणकीकृत आकडेवारी ही ६२ टक्क्यांवर आहे. उर्वरित डिजीटल नोंदणीचे काम १० दिवसात पूर्ण करावयाचे आहे असे अपर जिल्हाधिकारी प्रविण महिरे यांनी सांगितले. जिल्ह्यात एकूण ४६ लाख ३८ हजार ५८९ एवढे मतदार आहेत. आपल्या भागातील बीएलओंना नगरसेवकांनी मतदार शोधून देण्यासाठी मदत करावी असे आवाहन त्यांनी केले. सदर विशेष बैठक ही नागपूर मधील सहा विधानसभा मतदार संघाच्या अनुषंगाने घेण्यात आली.

# सावनेर क्षेत्रातील डीएनए कॅरिडॉरला शेतकऱ्यांचा विरोध

## जटामखोरा,सालई,माळेगांव या ग्रा .पं .ग्रामसभेतून ठराव मंजूर

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

***प्रस्तावित डीएनए कॉरिडॉरला शेतकऱ्यांचा विरोधः 'एक इंचही जमीन सोडणार नाही'ग्रामसभेचा ठराव एकमताने मंजूर.***

सावनेर तालुक्यातील जटामखोरा,सालई,व माळेगाव या ग्रामपंचायतींमध्ये सोमवारी झालेल्या ग्रामसभांमध्ये प्रस्तावित डीएनए (संरक्षण, अणु आणि एरोस्पेस) कॉरिडॉर प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली. ग्रामसभेत मोठ्या संख्येने शेतकरी आणि गावकऱ्यांनी सहभाग घेतला आणि 'आम्ही एक इंचही जमीन सोडणार नाही',असा ठराव एकमताने मंजूर केला. या भागात डीएनए



कॉरिडॉरसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे.गावकऱ्यांनी सांगितले की,शेती हा त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा मुख्य स्त्रोत आहे. शेतजमिनीच्या संपादनामुळे शेतकरी आणि शेतमजूर या दोघांच्याही रोजगाराला आणि उपजीविकेला गंभीर धोका निर्माण होईल.

स्थानिक शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कोणतेही भूसंपादन स्वीकारले जाऊ नये, अशी मागणीही ग्रामसभेने केली. एमआयडीसी प्रकल्पासाठीच्या भूसंपादन प्रक्रियेमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आता पीक कर्ज मिळवण्यात अडचणी येत आहेत. शेतकऱ्यांची यादी मिळाल्याचे कारण देत, नवीन पीक कर्जाच्या वितरणावर बंदी घालण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, बँक व्यवस्थापन त्यांना सांगत आहे की, एमआयडीसी प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित केली जाणार आहे, त्यांची यादी बँकेला मिळाली आहे.

त्याच वेळी, मिळालेल्या माहितीनुसार, महसूल विभागाच्या स्तरावरही ७/१२ जमिनीच्या नोंदींमध्ये बदल करण्यावर किंवा नवीन बोजा नोंदवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या मुद्द्याबाबत, बाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांना एक निवेदन दिले असून, या प्रकरणात योग्य हस्तक्षेप करण्याची आणि पीक कर्जाच्या वितरणातील अडथळे दूर करण्याची मागणी केली आहे.

# २१ व्या मजल्यावरुन तोल जाऊन खाली पडल्यानं वृद्ध महिलेचा मृत्यू

**वृत्तसंस्था, ठाणे**

ठाण्यातील माजीवाडा इथं धक्कादायक घटना घडली आहे. येथील वसंत लॉन्स 'सवाना टॉवर' या २३ मजली इमारतीच्या २१ व्या



मजल्यावरून तोल जाऊन खाली पडल्याने कुमुधा रमेश शेट्टी (७७) या वृद्ध महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना बुधवारी दुपारी ३ वाजून ४५ मिनीटांच्या सुमारास घडली आहे.

आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, गॅलरीत उभ्या असलेल्या कुमुधा शेट्टी यांचा अचानक तोल गेल्याने त्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील पोडियमच्या सज्जावर येऊन पडल्या. घटनेची माहिती मिळताच वर्तक नगर पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी हायड्रोलिक, रेस्क्यू वाहनांसह घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी सज्जावरून मृतदेह बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिला. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवला असून वर्तक नगर पोलीस पुढील तपास करत आहेत.

# गर्भलिंगनिदान कायदा जिल्हा न्यायालयात कार्यशाळा संपन्न

## पॅरा लीगल स्वयंसेवकांना बालक व महिलांच्या कायदेशीर हक्कांबाबत मार्गदर्शन, बाल न्याय, दत्तक प्रक्रिया, पीसीपीएनडीटी कायदा व महिलांविषयक कायद्यांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

समाजातील दुर्बल, वंचित व गरजू घटकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती प्रभावीपणे मिळावी आणि त्यांना आवश्यक कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून देता यावे, या उद्देशाने जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण, नागपूर यांच्या वतीने पॅरा लीगल स्वयंसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शेखर चु. मुनघाटे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम न्यायाधीश



कॉन्फरन्स हॉल, न्याय मंदिर, जिल्हा न्यायालय, नागपूर येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा न्यायालय प्रवीण उन्हाळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर NALSA व MSLSA गीताचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद मुनेश्वर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर यांनी केले.

प्रशिक्षणादरम्यान आनंद भिसे, विधी अधिकारी, जिल्हा रुग्णालय, नागपूर यांनी पीसीपीएनडीटी कायदा, १९९४ याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. गर्भलिंग निदानास प्रतिबंध, कायद्यातील तरतुदी तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत त्यांनी माहिती दिली.

त्यानंतर मुस्ताक पठाण, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, नागपूर यांनी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, नियमावली व बाल संरक्षणाशी संबंधित कायदे याबाबत मार्गदर्शन केले. बालकांच्या संरक्षणाची यंत्रणा, काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके, बाल कल्याण समितीची भूमिका तसेच बालकांच्या सर्वोत्तम हिताचे महत्त्व याबाबत त्यांनी माहिती दिली.

अ‍ॅड. सुजाता गुल्हाने, विधी अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, नागपूर यांनी दत्तक प्रक्रियेतील नवीन नियमावली व धोरण याविषयी मार्गदर्शन केले. कायदेशीर दत्तक प्रक्रिया, बालकांच्या हिताचे संरक्षण आणि अनधिकृत दत्तक प्रक्रियेपासून सावध राहण्याबाबत त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

सुनिल मेसरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नागपूर यांनी महिलांविषयक कायदे, हक्क व शासनाच्या विविध महिला-केंद्रित योजना याबाबत माहिती दिली. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि गरजू महिलांना उपलब्ध शासकीय व कायदेशीर मदतीशी जोडणे यामध्ये पॅरा लीगल स्वयंसेवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रविण उन्हाळे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. पॅरा लीगल स्वयंसेवकांनी कायद्याची माहिती केवळ स्वतःपुरती मर्यादित न ठेवता समाजातील गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचवून त्यांना योग्य कायदेशीर मार्गदर्शन व सहाय्य मिळवून देण्यासाठी संवेदनशीलतेने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे पॅरा लीगल स्वयंसेवकांना बालकांचे संरक्षण, महिलांचे हक्क, बाल न्याय व्यवस्था, दत्तक प्रक्रिया आणि विविध कायदेशीर तरतुदी याबाबत अद्ययावत माहिती मिळाली. समाजातील गरजू व वंचित घटकांना न्यायव्यवस्थेशी जोडण्यासाठी आणि त्यांच्यापर्यंत कायदेशीर सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

# चंद्रपूर महापालिका आमसभेत गोंधळ, ४५ नगरसेवकांचा बहिष्कार सभा तहकूब

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीवरून आणि वारंवार नियम डावलल्याच्या आरोपावरून आज चंद्रपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा गदारोळात तहकूब झाली. सत्ताधारी आणि विरोधकांसह तब्बल ४५ नगरसेवकांनी सभेवर बहिष्कार टाकल्याने महापालिकेचे वातावरण चांगलेच तापले.

बहिष्कार करणाऱ्यांमध्ये उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि भाजप, शिवसेना, शिवसेना उबाठा, काँग्रेस, महानगर आघाडी या चारही प्रमुख पक्षांच्या गटनेत्यांचा समावेश होता.

नगरसेवकांचा आरोप आहे की, प्रशासनाने नियमानुसार स्वीकृत सदस्य नियुक्तीचा प्रस्ताव दिला असतानाही महापौर संगीता खांडेकर यांनी तो विषय टाळला. तसेच वारंवार नियम डावलून सभा घेतल्या जात आहेत आणि आमसभेचे कामकाज मनमानी पद्धतीने चालवले जात आहे.

आज दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी मनपाची सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली होती विषय पत्रिकेवर




स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मुद्दा होता. आमसभेचा कोरम पूर्ण करण्यासाठी २२ नगरसेवकांची आवश्यकता असते. बहिष्कारामुळे महापौरांसह भाजपाचे केवळ ७ नगरसेवक सभागृहात उपस्थित होते. दरम्यान, काँग्रेसचे राजेश अडुर आणि वसंता देशमुख यांच्यासह काही नगरसेवकांनी हजेरी लावल्याने कोरम २२ पर्यंत पोहोचला. त्यानंतर महापौरांनी कामकाज सुरू केले.

याचवेळी काँग्रेसचे गटनेते सुरेंद्र अडबाले आणि महानगर आघाडीचे गटनेते पप्पू देशमुख आपल्या सहकाऱ्यांसह सभागृहात आले. देशमुख यांनी सचिव संतोष गर्गेलवार यांच्याकडून महानगरपालिका अधिनियमाचे पुस्तक हिसकावून घेतले आणि ते आयुक्तांसमोर ठेवून नियम वाचण्याची मागणी केली. यावेळी सचिवांचा माईकही तोडण्यात आला. बाहेर काँग्रेस आणि महानगर आघाडीच्या नगरसेवकांनी महापौर कार्यालयासमोर बॅनर घेऊन जोरदार घोषणाबाजी आणि निदर्शने केली.

भाजपाचे गटनेते शेखर शेट्टी नगरसेवक सुभाष कासमगोट्टूवार संजय कंचलावार तसेच उबाठाचे उपमहापौर प्रशांत दानव आणि स्थायी समिती अध्यक्षा मनस्वी गिऱ्हे यांनीही आक्रमक भूमिका घेत सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यासाठी दबाव आणला.

अखेर या अभूतपूर्व गोंधळानंतर महापौर संगीता खांडेकर यांनी सभा अनिश्चित काळासाठी तहकूब केल्याची घोषणा केली.

**नगरसेवकांचा आरोप काय**

१. स्वीकृत सदस्य नियुक्ती यापूर्वी रद्द झालेल्या सभेतील विषय पुन्हा जाणूनबुजून टाळला जात आहे.

२. नियमबाह्य कामकाज आमसभा वारंवार नियम डावलून बोलावल्या जात आहेत.

३. कंत्राटदारांना अभय गोंधळ करून अमृत पाणीपुरवठा आणि भूमिगत गटार योजनेच्या कंत्राटदारांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत आहे. यामुळे शहराच्या विकासात अडथळा निर्माण होत आहे.

थोडक्यात

## १७ ऑगस्टपूर्वी गणना पत्रक जमा करण्याचे मतदारांना आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत मतदारांना गणना अर्जांचे वितरण, संकलन आणि डिजिटायझेशनचे काम सुरू असून ते पूर्ण करण्याची अंतिम मुदत १७ ऑगस्ट २०२६ आहे. त्यामुळे मतदारांनी गणना पत्रक अचूक भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे तातडीने जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या मतदारांना गणना अर्ज प्राप्त झाले आहेत त्यांनी अर्जातील आवश्यक माहिती अचूक भरून, स्वाक्षरी करून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बीएलओकडे जमा करावा. गणना अर्ज अद्याप प्राप्त झाला नसल्यास किंवा अर्ज भरण्यासंदर्भात अडचण असल्यास संबंधित बीएलओशी संपर्क साधावा. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत विविध भागांत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. बीएलओ तसेच राजकीय पक्षांचे बूथस्तरीय एजंट यांच्या समन्वयातून घरोघरी भेटी देऊन प्रलंबित अर्जांचे संकलन करण्यात येत आहे. ५२-नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघात एकूण ३७८ मतदान केंद्रे असून ३७८ बीएलओ कार्यरत आहेत. त्याचबरोबर ३५ बीएलओ पर्यवेक्षक आणि १८ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी आहेत. मतदारसंघात एकूण ४,१२,३४१ मतदार आहेत. ५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आकडेवारीनुसार बीएलओंनी ३,६२,५०१ (८७.९१ टक्के) गणना पत्रकांचे वाटप केले होते. त्यापैकी २,२२,८६१ (५४.०५ टक्के) पत्रकांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले होते. अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा दुबार नोंद असलेले ७६,७९५ (१८.६२ टक्के) मतदार निश्चित करण्यात आले आहेत.

आयोगाने निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार ८ ऑगस्ट ही अंतिम तारीख होती. मात्र, सुधारित कार्यक्रमानुसार ही तारीख आता १७ ऑगस्ट, २०२६ करण्यात आली आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा दुबार नोंद असलेल्या मतदारांची वस्तुनिष्ठ माहिती बीएलओंना उपलब्ध करून द्यावी. मतदारांनी आपल्या नावाची नोंद, पत्ता, छायाचित्र आणि इतर तपशील योग्य असल्याची खात्री करावी. ज्यांनी अद्याप गणना पत्रक भरून दिलेले नाही त्यांनी संबंधित बीएलओशी संपर्क साधावा आणि शेवटच्या दिवसाची प्रतीक्षा न करता १७ ऑगस्टपूर्वी गणना अर्ज जमा करावा व राष्ट्रीय महत्त्वाच्या कामात प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नागपूर (शहर) सचिन कुमावत यांनी केले आहे.

## श्रीकृष्णराव बापुराव बुरघाटे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



महाकाली नगर नंबर २ येथील, रहिवासी श्रीकृष्णराव बुरघाटे यांचे बुधवारी आकस्मिक निधन झाले आहे. मृत्युसमयी त्यांचे वय ६९ होते. अंतिम संस्कार मानेवाडा घाटावर गुरुवारी दुपारी १२ वाजता करण्यात येईल. त्यांच्या पश्चात बराच मोठा परिवार आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**८ म्हशी जनावरांची सुटका, सावनेर पोलीसांची कामगिरी**

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पोलीस स्टेशन सावनेर दि. ०४/०८/२०२६ रोजी सावनेर पोलीस स्टेशन बेकायदेशीर धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खापा फाटा पाटणसांवगी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान १) महिंद्रा बोलेरो पिकअप क. एम एच-४०/सी डी ४३५९ २) वाहन क. एम एच-४०/सी टी- ८७०८ मिळुन आले.

पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता आरोपी नामे १) सुभाष श्रीराम इनवाते, वय २२ वर्ष २) विक्रम सुनील भलावी, वय १९ वर्षे, दोघे रा. जमुनिया कला, ता. चिडवणे जी. छिंदवाडा म. प्र. ३) नंदकिशोर चानसिंग गोणेकर, वय ३२ वर्षे, राज. रंजना, ता. छिंदवाडा म. प्र. हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता दोन्ही वाहनात प्रत्येकी ४ म्हशी याप्रमाणे त्यामध्ये ०८ म्हशी जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून दोन्ही वाहने आणि ८ म्हशी जनावरे असा एकुण किंमती ११,५५,०००/- रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपी १) सुभाष श्रीराम इनवाते, वय २२ वर्ष २) विक्रम सुनिल भलावी, वय १९ वर्ष, दोन्ही रा. जमुनिया कला, ता. बिछूआ जि. छिंदवाडा म. प्र. ३) नंदकिशोर चैनसिंग गोणेकर, वय ३२ वर्ष, रा. रांजना, ता. छिंदवाडा म. प्र. यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ११(१), (डी), (ई), (एफ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला असुन पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे.

## कोरची-कुरखेडा राष्ट्रीय महामार्गावरील बेडगाव घाटात बुधवारी भीषण अपघात, एक जण गंभीर जखमी

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

कोरची-कुरखेडा राष्ट्रीय महामार्गावरील बेडगाव घाटात बुधवारी भीषण अपघात घडला. छत्तीसगडहून कुरखेडाकडे येणाऱ्या मालवाहू ट्रकचा ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि समोरून येणाऱ्या कारला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले. या अपघातात आणखी दुसरी कारही दुर्घटनाग्रस्त झाली, तर ट्रक रस्त्याच्या कडेला उलटला. सुदैवाने एवढ्या भीषण अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.